वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग : वृक्षप्राधिकरण

प्रशासकीय ठराव क्र. २०८

दिनांक : ११/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :** वसई-विरार शहर महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण विभागाकरीता वृक्षतोड व छाटणीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :** वरील विषयांन्वये सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण विभागामार्फत, संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक उद्याने तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वृक्षांची छाटणी करणे व धोकादायक वृक्ष तोडणेचे काम केले जाते. सदर कामाकरीता महानगरपालिकेकडे ३ मॅकलिफ्टन वाहने उपलब्ध आहेत. ज्याठिकाणी मॅकलिफ्टन व्दारे छाटणी करणे शक्य नसते त्याठिकाणी मॅकलिफ्टन न वापरता आपल्या मजुरांमार्फत झाडांवर चढून छाटणी करावी लागते आणि वृक्षांची छाटणी केल्यानंतर मोठ्या फांद्यांचे छोटे भाग करणे आवश्यक असते. शहरात नुकतेच झालेल्या तौक्ते वादळामुळे सर्वत्र ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. सदर उन्मळून पडलेली झाडे कापणेचे तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या झाडांचे छाटणीचे काम उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीच्या सहाय्याने धिम्यागतीन चालू आहे. त्याकरीता सदरचे साहित्य हे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने वृक्ष छाटणी / तोडणीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कुऱ्हाड, कोयते, मॅन्युअल ट्री प्रुनर, दोर व इतर साहित्य उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर साहित्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | उपकरणाचे नाव | परिमाण | आवश्यक संख्या | बाजार भावाप्रमाणे अंदाजित रक्कम रू.प्रती नग | एकूण अंदाजित रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाना (Fix spanner Set ) | | ५ | ८५० | ४२५०/- |
| २ | रिंग पाना (Ring Spanner) | | ५ | १६६० | ८३००/- |
| ३ | स्क्रु ड्रायव्हर | | ५ | १८० | ९००/- |
| ४ | सेफ्टी गॉगल्स् (Eye Protector) | | २५ | ५० | १२५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | PVC Rope | १६ मिली मीटर | ४०० मीटर | २८० | १०१३१/- |
| ६ | PVC Rope | २५मिली मीटर | ४०० मीटर | २८० | ३११११/- |
| ७ | सेफ्टी हेल्मेट | | २५ | २०० | ५०००/- |
| ८ | कॉटन हॅण्डग्लोज | | २० | २०० | ४०००/- |
| ९ | ग्राईंडर | | ४ | २८०० | ११२००/- |
| १० | ग्राईंडर प्लेट | ४" (इंच) | ४ | २००० | ८०००/- |
| ११ | फावडा | | १० | १८० | १८००/- |
| १२ | परई | | १० | ४५० | ४५००/- |
| १३ | टिकाव | | १० | ३२० | ३२००/- |
| १४ | कानस (round file) | १२"(इंच) | १० | ४५० | ४५००/- |
| १५ | कानस (round file) | ६"(इंच) | १० | १५० | १५००/- |
| १६ | कानस चौकटी (round file) | ६"(इंच) | १० | १५० | १५००/- |
| १७ | कानस चौकटी (round file) | १२"(इंच) | १० | ३५० | ३५००/- |
| १८ | इलेक्टीक कटर मशिन चैन | १८"(इंच) | १० | १८०० | १८०००/- |
| १९ | पेट्रोल कटर मशिन चैन | २४"(इंच) | १२ | १८०० | २१६००/- |
| २० | कुऱ्हाड (मोठी) दांडासहित | | १० | ७०० | ७०००/- |
| २१ | कुदळ (मोठी) दांडासहित | | १० | ७०० | ७०००/- |
| २२ | कोयता | | १० | ५०० | ५०००/- |
| २३ | रेनकोट | | ४० | १२५० | ५००००/- |
| २४ | टेलिस्कॉपिक मॅन्युअल प्रुनर | | ७ | ११००० | ७७०००/- |
| | | | | **एकूण** | २,९०,२४२/- |

वरील सर्व साहित्य खरेदी करावयाचे असून त्याकरीता अंदाजीत रक्कम रु.२,९०,२४२ /- (अक्षरी- रक्कम रु. दोन लक्ष नव्वद हजार दोनशे बेचाळीस मात्र/-) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील 'संयत्रे व साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षकामधील तरतुद रक्कम रु.३० लक्ष (लेखा सांकेतांक -५५४ -२४३९) मधून भागविता येईल.

वरील संदर्भ क्र.१ व २ नुसार दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची मर्यादा रूपये ३ लाखावरुन १० लाखापर्यंत वाढविणेत आलेली आहेत. तरी सदर कामी वरील नमुद कामचे दरपत्रक प्रक्रियेव्दारे दर मागविणेकामी तसेच होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेपुढे मांडणेस मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** सदर प्रस्तावा मधील पावसाळ्यापूर्वी आपतकालीन परिस्थितीमध्ये धोकादायक वृक्षांची छाटणी करणे व पावसाळ्यात उन्मळून पडणाऱ्या वृक्षांची कापणेकरीता आवश्यक असणारे साहित्य खरेदीकामी दरपत्रक प्रक्रियेव्दारे दर मागवून व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

11/06

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग : वृक्षप्राधिकरण

प्रशासकीय ठराव क्र.२७० दिनांक :११/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :** वसई-विरार शहर महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण विभागाकरीता वृक्षतोड व छाटणीसाठी आवश्यक पेट्रोल कटर मशिन, जनरेटर व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :** वरील विषयांन्वये सादर करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण विभागामार्फत, संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक उद्याने तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वृक्षांची छाटणी करणे व धोकादायक वृक्ष तोडणेचे काम केले जाते. सदर कामाकरीता महानगरपालिकेकडे ३ मॅकलिफ्टन वाहने उपलब्ध आहेत. ज्याठिकाणी मॅकलिफ्टन व्दारे छाटणी करणे शक्य नसते त्याठिकाणी मॅकलिफ्टन न वापरता आपल्या मजुरांमार्फत झाडांवर चढून छाटणी करावी लागते आणि वृक्षांची छाटणी केल्यानंतर मोठ्या फांद्यांचे छोटे भाग करणे आवश्यक असते. शहरात नुकतेच झालेल्या तौक्ते वादळामुळे सर्वत्र ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. सदर उन्मळून पडलेली झाडे कापणेचे तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या झाडांचे छाटणीचे काम उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीच्या सहाय्याने धिम्यागतीन चालू आहे. त्याकरीता सदरचे साहित्य हे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने वृक्ष छाटणी / तोडणीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना धोकादायक वृक्षांच्या मोठ्या फांद्या कापणेसाठी सॉ-कटर मशिनची व चैन यांची आवश्यकता आहे. सदर आवश्यक साहित्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र. | उपकरणाचे नाव | परिमाण | आवश्यक संख्या | बाजार भावाप्रमाणे अंदाजित रक्कम रु.प्रती नग | एकूण अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मकिटा चैन सॉ-कटर (पेट्रोल)** | **२४" इंच फाटा** | ३ | ७०,०००/- | २,१०,०००/- |
| २ | **कटर मशिन चैन** | **२४" इंच** | ६ | २,०००/- | १२०००/- |
| ३ | **पेट्रोल रन जनरेटर** | **३ K.V.** | १ | १,०५,०००/- | १,०५,०००/- |
| | | | | **एकूण** | **३,२७,०००/-** |

वरील सर्व साहित्य खरेदी करावयाचे असून त्याकरीता अंदाजीत रक्कम रु. ३,२७,०००/- (अक्षरी - रक्कम रु. तीन लक्ष सत्तावीस हजार मात्र/-) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा होणारा खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील 'संयत्रे व साहीत्य

खरेदी' या लेखाशिर्षकामधील तरतुद रक्कम रु.३० लक्ष (लेखा सांकेतांक -५५४ -२४३९) मधून भागविता येईल.

वरील संदर्भ क्र.१ व २ नुसार दरपत्रकाच्या आधारे करण्यात येणाऱ्या खरेदीची मर्यादा रुपये ३ लाखावरुन १० लाखापर्यंत वाढविणेत आलेली आहेत. तरी सदर कामी वरील नमुद कामचे दरपत्रक प्रक्रियेव्दारे दर मागविणेकामी तसेच  होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.उपआयुक्त यांचेपुढे मांडणेस मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** सदर प्रस्तावा मधील पावसाळ्यापूर्वी आपतकालीन परिस्थितीमध्ये धोकादायक वृक्षांची छाटणी करणे व पावसाळयात उन्मळून पडणाऱ्या वृक्षांची कापणेकरीता आवश्यक असणारे पेट्रोल कटर मशिन, जनरेटर व इतर साहित्य खरेदी करणेकामी दरपत्रक प्रक्रियेव्दारे दर मागवून व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २११
विभाग : उद्यान
दिनांक : ११/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :** वसई -विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र, देखभालीकरिता कार्यरत असलेल्या ठेकेदारांना दि.०१ मे २०२१ ते दि.३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व  वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :** उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करणेत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र देखभाल व संगोपनकामी खालील नमुद तक्ता क्र.१ नुसार ठेक्याने देण्यात आली असून सदर देण्यात आलेल्या ठेक्याची मुदत दि.३१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आली होती. दि.२६/०३/२०२१ रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी खालील नमुद उद्याने, दुभाजके, हरित क्षेत्र देखभालीकामी दि.३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन येणाऱ्या रक्कम रु.१८,१०,७१८/- (अक्षरी - अठरा लक्ष दहा हजार सातशे अठरा रुपये मात्र/- ) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती.

**<u>तक्ता क्र.१</u>**

| अ.क्र. | उद्यान /तलावाचे नाव देखभाल | अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराचे नाव | रक्कम रु.प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | चक्रेश्वर तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | 1,56,598/- |
| २ | सी.पी.सोलंकी तलाव | मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस | 96,387/- |
| ३ | साने गुरुजी गार्डन | | |
| ४ | शिरगाव तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | 1,46,110/- |
| ५ | निर्मळ तलाव | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग | 2,49,641/- |
| ६ | दुभाजके | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग | 11,61,982/- |
| | | एकूण | 18,10,718/- |

तरी, सदर ठेकेदारांस खालील तक्ता क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.०१ मे २०२१ ते दि.३१ ऑगस्ट २०२१ या कालावधीकरीता देखभालीकामी रक्कम रु.७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रुपये मात्र ) इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | उद्यान /तलावाचे नाव देखभाल | अस्तित्वात असलेल्या ठेकेदाराचे नाव | रक्कम रू.प्रती महिना | रक्कम रु. चार महिन्यांकरीता |
|---|---|---|---|---|
| १ | चक्रेश्वर तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | 1,56,598/- | 6,26,392/- |
| २ | सी.पी.सोलंकी तलाव | मे.प्रणिक एंन्टरप्रायजेस | 96,387/- | 3,85,548/- |
| ३ | साने गुरूजी गार्डन | | | |
| ४ | शिरगाव तलाव | मे.बालाजी इंन्फ्राप्रोजेक्ट | 1,46,110/- | 5,84,440/- |
| ५ | निर्मळ तलाव | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग | 2,49,641/- | 9,98,564/- |
| ६ | दुभाजके | मे. ॲस्थेटिक लॅण्डस्केपिंग | 11,61,982/- | 46,47,928/- |
| | | एकूण | 18,10,718/- | 72,42,872/- |

वरील नमुद ठेकेदारांची मुदत दि.३०/०४/२०२१ रोजी संपुष्टात आली आहे. वरील सर्व दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र यांची ई-निविदा मागविणेची कार्यवाही चालू असून कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे सदर निविदेच्या प्रकियेमध्ये विलंब होत आहे तरी पुढील निविदा मंजुर होऊन पुढील कार्यदेश निर्गमित होईपर्यंत वरील सर्व नमुद ठेकेदारांना दि.०१ मे २०२१ ते दि.३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन रक्कम रु. ७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रुपये मात्र) इतक्या येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी मंजुरीस्तव सादर.

**ठराव निर्णय :** सदर प्रस्तावा मधील नमुद दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र देखभालीकरीता कार्यरत असलेल्या ठेकेदारास उद्यान देखभाल व संगोपन करणेकरीता देण्यात आलेल्या कामाची मुदत करारनाम्यानुसार दि.३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात आली आहे. सदर नमुद दुभाजके, उद्याने, तलाव, हरित क्षेत्र देखभालीकरीता ई-निविदा मागविणेची कार्यवाही चालू असून कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे सदर निविदेच्या प्रकियेमध्ये विलंब होत आहे तरी वरील सर्व नमुद ठेकेदारांना मुदतवाढ देणे संदर्भात दि.२६/०३/२०२१ रोजीच्या मंजुर टिपणीनुसार माहे एप्रिल २०२१ करीता होणाऱ्या रक्कम रु. १८,१०,७१८/- (अक्षरी - अठरा लक्ष दहा हजार सातशे अठरा रुपये मात्र/-) इतक्या खर्चास तसेच वरील सर्व नमुद ठेकेदारांना दि.०१ मे २०२१ ते दि.३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देऊन रक्कम रु.७२,४२,८७२/- (अक्षरी - बहात्तर लक्ष बेचाळीस हजार आठशे बाहत्तर रुपये मात्र ) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व),
जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग : बांधकाम विभाग

प्रशासकीय ठराव क्र. २९२ दिनांक : ११ /०६/ 2021

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. 81 मधील झालावाड गार्डन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. 81 मधील झालावाड गार्डन मधील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले असून सदर ठिकाणी नागरीकांची मोठया प्रमाणात गर्दी होते. सबब सद्यस्थितीत नागरीकांना उन्हाचे चटके सहन करत लसीकरणासाठी रांगेत उभे राहावे लागते. तसेच नजीकचा पावसाळा लक्षात घेता नागरीकांना पावसात रांगेत उभे राहण्याच्या दृष्टीने झालावाड गार्डन मधील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने लसीकरण केंद्रासाठी तातडीने शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 44,09,081/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 81 मधील झालावाड गार्डन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) क अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेचे सादर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) वॉर्ड क्र. 81 मधील झालावाड गार्डन येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रू. 44,09,081/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७

ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- २७३ | विभाग :- परिवहन

दिनांक :-११/६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर परिवहन सेवेअंतर्गत बस व बस स्टॉपवरील जाहीरात कराचा दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेने परिवहन सेवा BOOM (Buy, Own, Operate & Maintain) तत्वावर रॉयल्टी बेसिसवर निविदा प्रक्रिया करुन मे. एस एन एन (भागिदारी संस्था) या कंपनीसमवेत संदर्भ क्र. १ अन्वये दि. ०४/१२/२०२० रोजी करारनामा करुन १० वर्षासाठी परिवहन सेवा चालविण्यासाठी अभिकर्ता म्हणुन मे. एस एन एन (भागिदारी संस्था) यांची नियुक्ती केलेली आहे. सदर करारनाम्यानुसार परिवहन अभिकर्ता यांनी महानगरपालिकेच्या ३० बससहीत आपल्या स्वमालकीच्या बस परिवहन सेवेत स्वखर्चाने १० वर्षाकरीता चालविण्याच्या आहेत. त्यामुळे अभिकर्त्यास बस,इंधन,दुरुस्ती, कर्मचारी पगार व इ. खर्च करावयाचा आहे. त्यापोटी महानगरपालिका कोणतीही वेगळी रक्कम अभिकर्त्यास अदा करणार नाही. अभिकर्त्यास करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार तिकीट विक्री व बस आणि बस स्थानकावरील जाहीराती पासुन मिळणारे उत्पन्न घेण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. परंतु असे असले तरी करारनाम्यातील अट क्र. २५ नुसार अभिकर्त्यास जाहीरात कराची रक्कम महानगरपालिकेकडे वेळोवेळी भरणा करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील. त्यामुळे बस ऑपरेटर यांना जाहिरात कराची रक्कम भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाने दि. ०९/१२/२०२० रोजी प्रशासकीय ठराव २६० ने जाहिरात कराचे दर ठरविलेले आहेत. ते खालीलप्रमाणे

| अ. क्र. | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप | वसई विरार शहर महानगरपालिका नवीन सुधारित दर (रु. प्रति चौ. फुट प्रति महिना | |
|---|---|---|---|---|
| १ | मनपा जागेतील होर्डींग्ज (जाहिरात फलक) | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| २ | खाजगी जागेतील होर्डींग्ज (जाहिरात फलक) | प्रति चौ. फुट | २० | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | फ्लेक्स तात्पुरते / कापडी बॅनर्स (जास्तीत जास्त ०५ दिवसांसाठी) | ५० चौ फुटपर्यंत | १०० (प्रतिदिन) | २०० (प्रतिदिन) |
| | | ५० चौ फुटपेक्षा जास्त | २०० (प्रतिदिन) | ४०० (प्रतिदिन) |
| ४ | दिव्यांचे खांब्यावरील फलक (किऑक्स) | ५० चौ. फुटपेक्षा जास्त | ४० | ५० |
| ५ | दुकानावरील जाहिरातीचे फलक | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ६ | वाहनांवरील जाहिरात बॅनर व इलेक्ट्रीक होर्डींग्ज LED | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ७ | रोड शो / बलुन | प्रति चौ. फुट | १००० (प्रतिदिन) | १५०० (प्रतिदिन) |
| ८ | कॅन्टीलीव्हर | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| ९ | कमानी | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| १० | प्रदुषण व वातावरण दर्शक फलक व जाहिरात फलक | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ११ | भिंतीवरील जाहिरात | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| १२ | युनिपोल | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| १३ | अेंडपोल | प्रति चौ. फुट | २० | २५ |

परंतु, उपरोक्त नमुद जाहिरातीच्या प्रकारात परिवहन सेवेच्या बस व बसस्टॉपवरील जाहिरात प्रसिध्द करण्याचे जाहिरात कराचे दर ठरविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महापालिकेच्या बस व बसस्टॉपवरील जाहिरातीचे कराचे दर किती घ्यावेत ? याबाबतची दराची निश्चिती करणे आवश्यक आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये परिवहन सेवा अभिकर्ता मे. एस एन एन (भागिदारी संस्था) यांनी दि. १०/०३/२०२१ रोजी निवेदन देवून त्यात बस व बसस्टॉपवरील जाहिरात कराचे दर निश्चित करणेपूर्वी जाहिरात कराचे दर इतर जाहिरात प्रकारासारखे न ठेवता वाजवी ठेवावेत. त्याचे कारण बसस्टॉप हे प्रवाशांच्या सोयीसाठी उभारावे लागतात. त्यांची रंगरंगोटी, डागडुजी नियमितपणे करावी लागते व यासर्व बाबींसाठी खुप खर्च येतो. तसेच परिवहन अभिकर्ता नियुक्तीची निविदा हि उपरोक्त दर निश्चित करणेपुर्वी काढलेली व आम्ही आमची निविदा आपले जाहिरात कराचे दर प्रती स्के.फुट र.रु.३/- चे दर गृहीत धरुन भरलेली. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे दर आकारणी केल्यास आपण या करारनाम्यात आम्हाला जाहीरात करण्याच्या दिलेल्या अधिकाराचा उपयोग होणार नाही. वास्तव दर आकारणी केल्यास भरणा करता येणे शक्य होणार नाही. असे नमुद केलेले आहे.

परिवहन अभिकर्ता यांनी दिलेल्या निवेदनातील त्यांच्या मागणीमध्ये तथ्य आहे. आपली परिवहन सेवा ही इतर शहराच्या परिवहन सेवेपेक्षा वेगळया प्रकाराने चालविली जाते. त्यामुळे आपल्या परिवहन सेवेला इतर महानगरपालिकेप्रमाणे तोटा सहन करावा लागत नाही. त्याचप्रमाणे अभिकर्त्यामार्फत बसपोटी महानगरपालिकेस उत्पन्न देखील प्राप्त होत आहे. तसेच परिवहन सेवा चालवताना जरी तोटा आल्यास होणारा तोटा हा अभिकर्त्याला सोसावा लागतो. अभिकर्त्याने दिलेल्या निवेदनात जाहिरात कराचे दर हे प्रति बस प्रति माहे रक्कम रु. ५००/- व बस स्टॉपचे जाहिरात कराचे दर प्रति माहे प्रति बसस्टॉप रक्कम रु ५००/- याप्रमाणे आकारणी करण्यास सहमती दर्शविलेली आहे. अभिकर्त्याने दिलेल्या सहमतीनुसार जाहिरात कर वसुल केल्यास महानगरपालिकेला १६० बस स्टॉपवरील जाहिरात करापोटी प्रति माहे रक्कम रु. ८०,०००/- व सद्याच्या चालु ५० बसवरील जाहिरातपोटी प्रति माहे रक्कम रु. २५,०००/- असे एकुण रक्कम रु. १,०५,०००/- प्रति माहे जाहिरात कर प्राप्त होतील. तसेच बसच्या संख्येत कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव संपल्यानंतर वाढ होणार हे निश्चित आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या जाहिरात कराच्या मिळणाऱ्या उत्पन्नातही वाढ होणार आहे.

तरी परिवहन सेवेतील प्रती बस प्रती व बसस्टॉप यांचेवर प्रति माहे रक्कम रु. ५००/- प्रमाणे जाहिरात कर निश्चित करुन आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव सविनय सादर.

**<u>ठराव / निर्णय :-</u>** परिवहन सेवेतील बस व बसस्टॉप वरील प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहीरातीचे अधिकार अभिकर्त्यांस करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार देण्यात आलेले आहेत. सादर केलेल्या प्रस्तावानुसार दि. ०१/०४/२०२१ पासुन प्रति बस व प्रति बसस्टॉप प्रति माहे रक्कम रु. ५००/- जाहिरात कराचा दर आकारण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्रं. २९४ — विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा

दिनांक :- १९ /०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** अग्निशमन विभागाकडील वाहने सन २०२१-२०२२ या वर्षाकरीता ठेका पध्दतीने साहित्यासह देखभाल दुरुस्ती वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई - विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागात १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान ४) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ५) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ६) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ७) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) अशी मिळून एकुण ७ ठिकाणी अग्निशमन दले कार्यरत आहेत. अग्निशमन विभागाकडे सद्या एकुण ३० वाहने कार्यरत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कंपनीचे नाव | अग्निशमन वाहनाचा प्रकार | मॉडेल नं. | वाहनांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा | वॉटर टेंडर | १६१२/१६१६ | ०६ |
| २ | टाटा | मिनी वॉटर टेंडर | LPT ९०९ / ४०७ | ०८ |
| ३ | टाटा | फोम टेंडर | १६१२ | ०१ |
| ४ | टाटा | रेस्क्यु व्हॅन | १६१६ | ०१ |
| ५ | टाटा | वॉटर बाऊझर | २५१८ | ०२ |
| ६ | टाटा | क्विक रिस्पॉन्स व्हेईकल | २०२ | ०१ |
| ७ | मान | वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर | CLA ३१.३०० BS IV | ०१ |
| ८ | भारतबेंझ | हॅझमॅट | | ०१ |
| ९ | महिंद्रा ॲण्ड महिंद्रा | बोलेरो जीप | Bol ZNX २ wd BS४ | ०२ |
| १० | रॉयल एन्फील्ड | टु व्हिलर बुलेट वाहन | इलेक्ट्रा रेड | ०७ |
| | | | एकुण | ३० |
| | | | | |

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मनपा मालकीच्या एकुण वाहनांची देखभाल दुरुस्ती संदर्भाने A.M.C. (ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रक्ट) सन २०१८-२०१९ व २०१९-२० या वर्षाकरीता वाहन विभागामार्फत ई-निविदा कार्यप्रणालीने करण्यात आली होती. त्यातील मंजूर निविदाकारामार्फतच सर्व वाहनांची देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे. कारणाने सद्या अग्निशमन विभागाकडील वाहनांची देखभाल दुरुस्तीचे काम महापालिकेच्या वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फतच करण्यात येते. अग्निशमन वाहनांच्या देखभाल दुरुस्ती कामी सन २०२१-२२ या वित्तिय वर्षामध्ये अंदाजीत रक्कम रु. ७० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

वाहन विभागामार्फत महानगरपालिका मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे कामी सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रैवार्षिक वर्षासाठी ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून मा. प्रशासकीय ठराव क्रं. ४५४, दिनांक ०४/०२/२०२१ अन्वये संविदा करणेस मंजुरी प्राप्त झालेवरुन दिनांक १२/०२/२०२१ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. तसेच जा.क्रं. वविशम/वाहन/६१६/२०२१ दिनांक ३१/०३/२०२१ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

वाहन विभागाने मंजूर केलेल्या वाहनांच्या देखभाल दुरुस्ती ई-निविदामध्ये अग्निशमन वाहनाचे वाहनांना लागणा-या वस्तू (वाहन दुरुस्तीच्या) चे दर मंजूर आहेत. त्यामुळे अग्निशमन विभागातील वाहनांचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे सदर मंजूर ठेक्यातून करता येतात तसेच होणा-या अदांजीत रक्कम रु. ७० लक्ष खर्चानुसार सदर मंजूर ठेकेदाराकडून रक्कम रु. ६१००/- चे वाढीव मुद्रांक शुल्क दिनांक १३/०५/२०२१ रोजी भरुन घेण्यात आले आहे.

अग्निशमन वाहनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात अग्निशमन वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. १ कोटी ५ लक्ष तरतूद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन वाहने कार्यक्षम व सुस्थितीत ठेवण्याकरीता सन २०२१-२२ या वित्तिय वर्षासाठी वार्षिक ठेका पध्दतीने दैनंदिन देखभाल व दुरुस्ती वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणे करीता व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७० लक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

<u>**ठराव :-**</u> वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहनांची सन २०२१-२२ या वर्षाकरीता दैनंदिन देखभाल दुरुस्ती वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७० लक्ष खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्रं.** २७५

दिनांक :- ११ /०६/२०२१
विभाग:- अग्निशमन व आणिबाणी सेवा

---

**विषय:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये फॅब्रिकेशनचे केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये आवश्यक वैद्यकिय साधने, ऑक्सिजन सिलेंडर ट्रॉली इत्यादी आवश्यक उपकरणे ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी फॅब्रिकेशन करणे कामी जा.क्रं. वविशम/अग्नि/मुका/१०६३/२०२१, दिनांक १५/०३/२०२१ रोजीचे जाहिर दरपत्रक http://vvcmc.in या संकेतस्थळावर दिनांक १८/०३/२०२१ रोजी प्रसिध्द करुन दिनांक ३०/०३/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत दरपत्रके इच्छुक पुरवठादाराकडून मागविण्यात आलेली होती. सदर मुदतीत एकुण ३ दरपत्रके प्राप्त झाली. प्राप्त दरपत्रके दिनांक ३१/०३/२०२१ रोजी सांय. ४.१५ वाजता उघडण्यात आली.

प्राप्त दरपत्रकामधील अ.क्रं. १ ते १२ मधील वस्तु व सेवा करासह तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहेत.

<table>
<tr><th rowspan="2">अ. क्रं.</th><th rowspan="2">फॅब्रिकेशन तपशील</th><th rowspan="2">परिमाण</th><th>एस.जे. डिझाईन</th><th>एस.पी. ऑटोमोटिव्ह</th><th>मेडियन हेल्थकेअर प्रा.लि.</th></tr>
<tr><th colspan="3">दोन नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये अ.क्रं. १ ते १२ मधील नमूद आवश्यक प्रकारची उपकरणे ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी फॅब्रिकशन करणे कामाची वस्तु व सेवा करासह किमंत</th></tr>
<tr><td>1</td><td>Behind the co-driver seat one no. stainless steel water tank with motor and required pipe line connection up to the wash basin.</td><td>2</td><td rowspan="12">रु. ३,१८,६००/-</td><td rowspan="12">रु. २,८९,१००/-</td><td rowspan="12">रु. ३,२८,०४०/-</td></tr>
<tr><td>2</td><td>After the partition company fitted furniture's with two fixed seats and one no. single seat at left sides to be removed and above the coverings of double oxygen brackets we will provide storage unit fabricated in stainless steel 316 grade materials with telescopic drawers and one corner wash basin with S.S. tap and foot operated starter switch.</td><td>2</td></tr>
<tr><td>3</td><td>One no. folding seats for Doctor to be fitted to the cover of the oxygen cylinder (near the patients head / trolley at center)</td><td>2</td></tr>
<tr><td>4</td><td>At right side one no. storage unit fabricated in stainless steel 316 grade materials with telescopic drawers and provision to keep smaller medicine bottles.</td><td>2</td></tr>
<tr><td>5</td><td>For right side hump covering in stainless steel 316 grade materials.</td><td>2</td></tr>
<tr><td>6</td><td>Raised platform with folding flap and below the platform space to keep spine board and scoop stretcher and top fitment of your supplied along with the vehicles Auto loading trolley cum stretche.</td><td>2</td></tr>
<tr><td>7</td><td>One no. S.S. medium oxygen cylinder bracket at right side corner.</td><td>2</td></tr>
<tr><td>8</td><td>For I. V. holder hooks and belts to be provided.</td><td>2</td></tr>
<tr><td>9</td><td>At rear entrance one no. PVC Arm sling and S.S. assist handle.</td><td>2</td></tr>
<tr><td>10</td><td>For main entrance at rear wide external foothold LED strip lights.</td><td>2</td></tr>
<tr><td>11</td><td>Two nos. round type yellow fog lamps in front bumper.</td><td>2</td></tr>
<tr><td>12</td><td>Wheel Caps.</td><td>2</td></tr>
</table>

उपरोक्त तीन दरपत्रकातील दरांची तुलनात्मक पडताळणी केली त्यामध्ये **मे. एस.पी. ऑटोमोटिव्ह** यांचे फॅब्रिकेशन करणे कामाबाबतचे दर तुलनात्मक कमी आहेत. व प्राप्त झालेले दर हे बाजारभावाप्रमाणे योग्य व वाजवी आहेत.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये आवश्यक वैद्यकिय साधने, ऑक्सिजन सिलेंडर ट्रॉली इत्यादी आवश्यक उपकरणे ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी फॅब्रिकेशन करणे कामी प्राप्त दरपत्रकामधील **मे. एस.पी. ऑटोमोटिव्ह** यांचे कमी दराचे दरपत्रक मंजुर झाले आहे व संविदा करुन कार्यादेश देण्यात आला आहे तरी **मे. एस.पी. ऑटोमोटिव्ह** यांचेकडून २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये फॅब्रिकेशन काम केले बाबतचे रक्कम रु. २,८९,१००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये कार्योत्तर मंजूरी मिळणेस सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स वाहनांमध्ये आवश्यक लागणा-या सुविधा तसेच आवश्यक उपकरणे बसविणेसाठी लागणारी संरचना कंपनीकडून पुरविण्यात येणा-या कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये येत नसल्याने आवश्यक उपकरणे, साधने कमी जागेत त्याची मांडणी सुयोग्य पध्दतीने करण्यासाठी फॅब्रिकेशन करणे आवश्यक असल्याने दोन नग कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये **मे. एस.पी. ऑटोमोटिव्ह** मध्ये फॅब्रिकेशन काम करणे कामी रक्कम रु. २,८९,१००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ क व ड अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५**
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग : बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. २९८ दिनांक : १४/०६/२०२१

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दत्तधाम दफनभुमीत पाथवे बांधणे व अनुषंगिक कामे करणे कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दत्तधाम दफनभुमीत पाथवे बांधणे व अनुषंगिक कामे करणे.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. २९,७१,५६४/- (सुधारीत रक्कम)

३) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दत्तधाम ख्रिस्ती दफनभुतीत कंपाऊंड वॉल लगत पाथवे व ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) बांधणेचे काम पुर्ण करण्यात आले आहे. सदर कामास मा. स्थायी समिती ठ.क्र. ०३ दि. २६/०७/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. १७,०९,१३३/- इतकी आहे. त्यानुसार मा. कार्यकारी अभियंता यांचेकडुन क्र. I/२४/१११ दि. ०७/०८/२०१९ रोजी तांत्रिक मंजुरी घेण्यात आली.

तद्नंतर दै. डि.एन.ए., दै. पुर्णविराम, दै. प्रहार रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदे प्रक्रियेमध्ये कमी दराची निविदा मे. इरा एंटरप्रायजेस यांची १६.१६% कमी दराची निविदा मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचा ठराव क्र. २२३ दि. ११/११/२०२० रोजी संविदा मंजुरी करण्यात आली आहे.

त्याप्रमाणे ठेकेदार मे. इरा एंटरप्रायजेस यांना दि. ०३/१२/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आला.

त्यानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामास सुरुवात केलेली आहे. मुळ अंदाजपत्रकात कंपाऊंड लगत पाथवे बांधणे. ग्रेव्हयार्डस (दफनपेटी), पाण्याची टाकी, बोनवेल इ. कामे प्रस्तावति करण्यात आली होती. त्यानुसार पाथवे बांधणेचे काम सुरु आहे. तसेच ग्रेव्हयार्डस (दफन पेटीचे) काम सुरु करण्यात आले. सदर ग्रेव्हर्याडस बांधणेच्या कामात कॉंक्रीट पडदीचा अंतर्भाव होता परंतु प्रत्यक्ष काम करते वेळी सी.सी. पडदीस स्थिरता मिळणे कठिण वाटत असल्याने मा. कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांनी पडदी मध्ये लोखंडी सळयाचे समाविष्ट करुन घेणेबाबत सुचविले. तसेच सदर कामात ५० ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) बांधणेचे काम घेण्यात आले होते तद्नंतर मा. आयुक्त सो. यांनी १०० ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) बांधणेबाबत सुचविले आहे. त्यानुसार सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सद्यस्थित नविन जिल्हा दरसुची (सन २०१९-२०) प्रसिध्द झालेली आहे. त्यानुसार दर सुची मध्ये १०-१५ टक्के वाढ झालेली आहे. सदर कामी

होणारे वाढीव काम ठेकेदाराकडुन करुन घेतल्यास जुन्या दर सुचीनुसार काम करुन घेता येईल. तसेच काम वेळेत पुर्ण करुन घेता येईल. मुळ अंदाजपत्रकात ५० ग्रेव्हयार्डस (दफनपेटी), पाथवे, माती भराव व विद्युतीकरणाचे कामास रु. १७,०९,१३३/- इतका खर्च होणे अपेक्षित होते. परंतु सदर कामास सद्यस्थित मुळ अंदाजपत्रकातील ५० ग्रेव्हयार्डस (उनपेटी), पाथवे, माती भराव व विद्युतीकरण तसेच वाढीव ५० ग्रेव्हयार्डस (दफनपेटी) च्या कामास रु. २९,७१,५६४/- इतका खर्च होत आहे. तरी सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रु. २९,७१,५६४/- इतक्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस व सदर काम मुळ ठेकेदाराकडुन करुन घेण्यास मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव सादर करित आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- पाथवे, ग्रेव्हयार्ड (दफनपेटी), माती भराव.
परिमाण :- पाथवे : लां. २१५ मी, रुं. १.०० मी
लां. ८५ मी रुं. १.५० मी
ग्रेव्हयार्ड (दफनपेटी) : १०० बॉक्स
साईज : ०.९० X २.१० मी
माती भराव : ४५० घ.न.मी.

५) यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- यापुर्वी सदर जागेत कंपाऊंड वॉल गेट, वॉचमेन केबीन, बाथरुम, शेड, पाथवे इ. कामे झालेली आहेत.

६) जागेची मालकी :- वविशम
७) विकास आराखडयातील आरक्षण :-
८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष :- एकात्मीक दहनभुमी विकास कार्यक्रमा अंतर्गत दहन व दफनभुमीसाठी भुसंपादन व विकासासह अस्तित्वातील दहन व दफनभुमींचा विकास तसेच विद्युत व गॅस दाहिनी व्यवस्था
९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. १९ अ.क्र. २९२९ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील दत्तधाम दफनभुमीत पाथवे बांधणे व अनुषंगिक कामे करणे कामी सुधारीत रक्कम रु. २९,७१,५६४/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकात प्रशासकीय व वित्तीय मंजुरीसह सदरचे वाढीव काम मुळ ठेकेदारांकडुन पुर्ण करुन घेणेस मंजुरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** २९७ **दिनांक -** १४/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा कार्यक्षेत्रातील तुळींज बाजाराची फी वसुलीकामी सन २०२१-२४ या वित्तीय वर्षाकरीता वार्षिक ठेका पध्दतीने वसुलीस देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर** - वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा क्षेत्रातील तुळीज हद्दीतील बाजार सन २०१८-२१ करीता देण्यात आला होता. सदर बाजार कराची मुदत ३१ मार्च २०२१ रोजी संपुष्टात आलेली आहे. तथापि सन २०२० मध्ये जगभरात कोरोना प्रादुर्भाव झाल्याने शासनाने ताळेबंदी (लॉकडाऊन) केले होते. दरम्यानच्या काळात सर्व बाजार बंद होते. त्याअनुषंगाने ठराव क्र. १५६ दि.०४/०६/२०२१ नुसार २१ च्या प्रशासकीय ठरावानुसार एप्रिल २०२१ ते जुन २०२१ च्या कालावधीसाठी सुट देणेस प्रशासकिय मान्यता देण्यात आली. तरि सदर मुदत ३० जुन २०२१ रोजी संपणार असल्याने बाजाराचा कर वसुली ठेका हा ठेका पध्दतीने देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाजाराचे नाव | बाजाराची हद्द | बाजार कराची निविदेची मुदत | मागील तीन वर्षाची मंजुर रक्कम रूपये | मागील वर्षाच्या मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन देणारी रक्कम रूपये | सन २०२१-२४ साठी किमान देकार रक्कम - निविदा कालावधीमधील (प्रथम वर्ष २०२१-२२ साठीची) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुळींज बाजार कर | तुळींज आर वो बी रोड पेल्हार रोड लगत ते मोरेगाव, वालईपाडा अशी हद्द असेल | ३१/०३/२०२१<br><br>(०१/०४/२०१९ ते ३०/०६/२०१९ मुदतवाढ) | सन - २०१८-१९ मुदतवाढ ५३,८५,५२१/-<br><br>सन - २०१९-२० (मुदतवाढ व नंतर निविदा रक्कम -७८,०१,०००/-) ६९,१४,६७२/-<br><br>सन - २०२०-२१ ८५,८१,०९२/- | ८,५८,१०९/- | ९४,३९,२०१/- |

तरी वरीलप्रमाणे तुळींज येथील बाजाराच्या हद्दीमध्ये प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील काही भाग समाविष्ट असून सदर कार्यक्षेत्रातील बाजार वसुलीची कार्यवाही प्रभाग समिती (बी) मधून सन २०१८ ते २०२१ मध्ये या बाजाराची ई-निविदा करण्यात आलेली होती. त्यानुसार बाजाराची ई-निविदा प्रक्रिया प्रभाग समिती (बी) मधुन करणेचे सोईचे होईल.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील मंजूर रक्कम रु. ८५,८१,०९२/- या रक्कमेवर १०% वाढ करुन येणारी रक्कम रु. ९४,३९,२०१/- इतकी रक्कम सन २०२१ ते २०२४ या निविदा कालावधीमधील प्रथम वर्ष २०२१-२२ साठी अपेक्षित किमान देकात रक्कम असेल. त्यानुसार उर्वरीत निविदा कालावधीमध्ये प्रतिवर्षी १० % वाढ करणे अपेक्षित आहे.

सन २०२१ ते सन २०२४ ३ वर्षाकरीता असून तुळींज बाजार कराची सन - २०२१ चा वित्तीय वर्षाची निविद रक्कम रू.८५,८१,०९२/- होत असून रकमेवर प्रत्येक वर्षी १०% वाढ करून दि.०१/०७/०२१ ते ३१/०३/०२४ या ३३ महिन्याच्या कालावधी करिता कोविड - १९ च्या प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन लावल्याने ठेकदाराला ३ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. सन - २०२१-२२ च्या निविदा रक्कम ठरवताना ३ महिन्याची रक्कम कमी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

| सन | कालावधी | रक्कम |
|---|---|---|
| २०२१ - ०२२ | दि. ०१/०७/२०२१ ते ३१/०३/२०२२ | ७०,७९,४०१/- (+२% आयकर) |
| २०२२ - ०२३ | दि. ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ | १,०३,८३,१२१/- (+२% आयकर) |
| २०२३ - ०२४ | दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ | १,१४,२१,४३३/- (+२% आयकर) |
| **एकूण** | | **२,८८,८३,९५५/- (+२% आयकर)** |

तरी तुळींज बाजार करासाठी रक्कम रु. २,८८,८३,९५५/- इतका किमान देकार (निविदा कालावधी २०२१-२४ रक्कम निश्चित करुन प्रतिवर्षी २% आयकर आकारुन हि निविदा मागविणेस वर्तमानपत्रात हि जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणेकामी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २९८

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १४/०६/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत कार्यरत नवजात बालकांच्या रुग्णालयाकरिता आवश्यक Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेस व याकामी येणा-या संपूर्ण खर्चास प्रशासकीय वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार कौलसिटी -वसई, व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे सर्मपित कोविड - केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. शासनामार्फत पुढिल कालावधीत लहान मूलांची विशेष काळजी घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्याकरिता नवजात बालक व लहान बालके यांच्या उपचाराकरिता बोळींज, विरार (प) येथे नव्याने रुग्णालय उभारण्यात आले असुन सदर रुग्णालयाकरिता Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) ची आवश्यकता आहे. याकरिता निविदा यादीमध्ये मंजुर असलेल्या घटकांची मागणी नोदविण्यात आलेली आहे. परंतु निविदा यादीत सामाविष्ट नसलेले तसेच समाविष्ट असुन पुरवठाधारक पुरवठा करण्यास असमर्थ असलेले उपकरणे व साहित्य स्थानिक पातळीवर त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. याकामी याकामी मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प), मे.फार्मा वर्ल्ड, मिरा रोड, मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस, पुणे या अधिकृत विक्रेत्याकडे उपलब्ध असून यांच्यामार्फत दर प्राप्त झाले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | उपकरणाचे नाव | मागणी | मे.प्रनिक इंटरप्रायझेस | मे.फार्मा वर्ल्ड | मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस | सर्वात कमी दर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) Tidal Volume- 2ml-300ml with Inbuilt Turbine with servo humidifier | 20 | 650000 | 720000 | 700000 | 650000 | 13000000 |
| | | | | | | GST 12% | 1560000 |
| | | | | | | Total | 14560000 |

सद्यस्थितीत मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प) यांच्याकडील प्राप्त दर सर्वात कमी असुन यांच्याकडे वरील नमुद Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदरचे Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) खरेदी करणे कामी रू.१,४५,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ अंतर्गत मा.आ.श्री.हितेंद्र विष्णू ठाकूर, वसई मतदार संघ व मा. आमदार श्री.क्षितिज हितेंद्र ठाकूर, नालासोपारा मतदार संघ यांना त्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैद्यकीय यंत्र सामुग्री व साहित्य खरेदी करणेकामी देण्यात आलेल्या आमदार निधीचा दिलेल्या प्रस्तावानुसार सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरचे Ventilator (Paediatric Machine & Neonatal Ventilator) विनानिविदा खरेदी करणेकामी मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प) यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रू.१,४५,६०,०००/- (अक्षरी- एक कोटी पंचेचाळीस लाख साठ हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

P|1

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २१८

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १४/०६/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास नवजात बालकांच्या रुग्णालयाकरिता आवश्यक ICU Bed विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेस व याकामी येणा-या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार कौलसिटी -वसई, व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे समर्पित कोविड - केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देतात. शासनामार्फत तसेच संभाव्य येणारी तिसरी लाट यामध्ये लहान मुले संक्रमित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी पुढिल कालावधीत लहान मूलांची विशेष काळजी घेण्याकरिता नवजात बालक व लहान बालके यांच्या उपचाराकरिता बोळींज, विरार (प) येथे नव्याने रुग्णालय उभारण्यात आले असुन सदर रुग्णालयाकरिता ICU Bed ची आवश्यकता आहे. याकरिता निविदा यादीमध्ये मंजुर असलेल्या घटकांची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. परंतु निविदा यादीत सामाविष्ट नसलेले तसेच समाविष्ट असुन पुरवठाधारक पुरवठा करण्यास असमर्थ असलेले उपकरणे व साहित्य स्थानिक पातळीवर त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. याकामी मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प), मे.फार्मा वर्ल्ड, मिरा रोड, मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस, पुणे या अधिकृत विक्रेत्याकडे उपलब्ध असून यांच्यामार्फत दर प्राप्त झाले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच सदर दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहे.

P|७

| अ. क्र. | उपकरणाचे नाव | मागणी | मे.प्रनिक इंटरप्रायझेस | मे.फार्मा वर्ल्ड | मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस | सर्वात कमी दर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ICU Bed 3 FUNCTION | 50 | 25000 | 70000 | 35000 | 25000 | 1250000 |
| | | | | | | GST 18% | 225000 |
| | | | | | | Total | 1475000 |

सद्यस्थितीत मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प) यांच्याकडील प्राप्त दर सर्वात कमी असुन यांच्याकडे वरील नमुद ICU Bed उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदरचे ICU Bed त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास ICU Bed खरेदी करणे कामी रू.१४,७५,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ अंतर्गत मा.आ.श्री.हितेंद्र विष्णू ठाकूर, वसई मतदार संघ व मा. आमदार श्री.क्षितिज हितेंद्र ठाकूर, नालासोपारा मतदार संघ यांना त्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वैद्यकीय यंत्र सामुग्री व साहित्य खरेदी करणेकामी देण्यात आलेल्या आमदार निधीचा दिलेल्या प्रस्तावानुसार सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरचे ICU Bed विनानिविदा खरेदी करणेकामी मे.प्रनिक इंटरप्रायझेस, नालासोपारा (प) यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रू.१४,७५,०००/- (अक्षरी- चौदा लाख पंच्याहत्तर हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** २२० | विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १४ / ०६ / २०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :-

१. जलशुध्दीकरण केंद्र पेल्हार ते नालासोपारा फाटा दरम्यान ४०० मी.मी. व्यासाची २७०३ मीटर व ४५० मी.मी. व्यासाची ६४७ मीटर एस.सी. जलवाहिनी बदलून त्याऐवजी DI K-७ प्रकारची जलवाहिनी अंथरणे.

२. गावराईपाडा नाका ते एव्हरशाईन सीटी ३०० मी.मी. व्यासाची ४१८० एस.सी. जलवाहिनी बदलून त्याऐवजी DI K-७ प्रकारची जलवाहिनी अंथरणे.

**अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३,९०,८६,६५३/-**

**प्रस्तावाचा मजकूर** :- पेल्हार पाणी पुरवठा योजनेअंतर्गत दोन योजना कार्यान्वित असून महानगरपालिकेस १० द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. सदर योजनेअंतर्गत सन १९८४ पुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत मुख्य जलवाहिन्या अंथरण्यात आल्या असून सद्य:स्थितीत अस्तित्वातील एस.सी. प्रकारच्या जलवाहिन्या कमकुवत झाल्या आहेत.

वारंवार होणाऱ्या गळतीमुळे जलवाहिन्यांचे परिक्षण विभागामार्फत करण्यात आले असून सदर जलवाहिन्या ह्या १९८४ पुर्वी अंथरल्या आहेत तसेच सदर AC जलवाहिन्या सरासरी १५-२० फुट भुमीगत असून बऱ्याच भागात जलवाहिनीवर बांधकामे झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही ठिकाणी सदरच्या जलवाहिन्या रस्ता रुंदीकरणामुळे अस्तित्वातील रस्त्याच्या मध्यभागी भुमीगत आहेत. सदर जलवाहिन्या कमकुवत तसेच जिर्ण झाल्याने त्या तातडीने बदलणे आवश्यक असल्यचे अभिप्राय दिले आहेत.

पेल्हार योजने अंतर्गत खालील प्रमाणे एस.सी. जलवाहिन्या अंथरल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | पाईप प्रकार व व्यास | पाईप लांबी (मीटर) |
|---|---|---|---|
| १ | जलशुध्दीकरण केंद्र पेल्हार ते नालासोपारा फाटा | AC ४०० mm | २७०३ |
| | | AC ४५० mm | ६४७ |
| २ | गावराईपाडा नाका ते एव्हरशाईन सीटी | AC ३०० mm | ४१८० |
| | | एकूण | ७५३० |

उपरोक्त ए.सी. प्रकारच्या जलवाहिन्यांना वारंवार गळती लागत असून त्या कमकुवत झाल्या असल्याने गळती दुरूस्ती करताना अनेक अडचणी येत आहेत. याकरीता वरील जलवाहिन्यांऐवजी खालील प्रमाणे नव्याने जलवाहिन्या अंथरणे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | पाईप प्रकार | व्यास | पाईप लांबी (मीटर) |
|---|---|---|---|---|
| १ | जलशुध्दीकरण केंद्र पेल्हार ते नालासोपारा फाटा | DI K-७ | ४०० mm | २५७१ |
| | | MS Spl. | ४०० mm | १३२ |
| | | DI K-७ | ४५० mm | ६०५ |
| | | MS Spl. | ४५० mm | ४२ |
| २ | गावराईपाडा नाका ते एव्हरशाईन सीटी | DI K-७ | ३०० mm | ३९७० |
| | | MS Spl. | ३०० mm | २१० |
| | | | एकूण | ७५३० |

उपरोक्त प्रमाणे DI K-७ प्रकारच्या जलवाहिन्या अंथरणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१९-२० च्या दरसूचीवर आधारीत रू.**३,९०,८६,६५३/-** चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्चास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्य:स्थितीत शासनाने महापालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली असून आयुक्त तथा प्रशासक यांना सदरचे अधिकार निहित आहेत.

सदर कामी येणारा रु. **३,९०,८६,६५३/-** खर्च **"वसईरोड (पेल्हार) प्रादेशीक नळ पाणीपुरवठा योजनेवरील खर्च"** या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य असून सन २०२१-२२ व २०२२-२३ या दोन आर्थिक वर्षात खर्च होणार आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रू. १९१.४९ कोटी व उर्वरीत खर्च सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात होणार असल्याने पुढील आर्थिक वर्षात पुरेशी तरतुद करण्याची दक्षता विभागामार्फत घेण्यात येईल.

तरी उपरोक्त कामासाठी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे

पेल्हार पाणी पुरवठा योजनेतील ३०० मी.मी., ४०० मी.मी. व ४५० मी. मी. व्यासाची अस्तित्वातील एस.सी. जलवाहिनी ऐवजी नविन DI K-७ प्रकारची जलवाहिनी अंथरणे कामी येणाऱ्या रू.३,९०,८६,६५३/- अंदाजपत्रकीय खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकिय मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

..............................................................................................................

**ठराव :-**

१. जलशुध्दीकरण केंद्र पेल्हार ते नालासोपारा फाटा दरम्यान ४०० मी.मी. व्यासाची २७०३ मीटर व ४५० मी.मी. व्यासाची ६४७ मीटर एस.सी. जलवाहिनी बदलून त्याऐवजी DI K-७ प्रकारची जलवाहिनी अंथरणे तसेच गावराईपाडा नाका ते एव्हरशाईन सीटी ३०० मी.मी. व्यासाची ४१८० एस.सी. जलवाहिनी बदलून त्याऐवजी DI K-७ प्रकारची जलवाहिनी अंथरणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रु.३,९०,८६,६५३/- खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.
२. सदर कामी बी/१ प्रकारची ई-निविदा मागवून सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात पुरेशी तरतुद करून खर्च भागविण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** २२१

विभाग :- पाणी पुरवठा

दिनांक :- १४/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- :- वसई – विरार शहर महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे.

**प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**अंदाजपत्रकीय रक्कम** :- **रु. ९,९०,०००/-**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई – विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ व ३ अंतर्गत २०० द.ल.ली पाणी पुरवठा होत असुन धुकटण येथे जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर केंद्रामध्ये येणाऱ्या अशुध्द पाण्यास ॲलम व क्लोरीन ची डोसिंग करण्यात येऊन क्लॅरिफ्लॉक्युलेटरमध्ये सदरचे पाणी Settle करण्यात येते. Settle Water Filter करण्यात येऊन शहरास शुध्द पाण्याचा पुरवठा केला जातो.

धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामध्ये जुन्या योजनेअंतर्गत ५ ML क्षमतेचे २ क्लॅरिफ्लॉक्युलेटर व नवीन योजनेअंतर्गत ६ ML क्षमतेचे २ असे एकूण ४ क्लॅरिफ्लॉक्युलेटर टँक आहेत. सदरच्या टँक मध्ये ॲलमच्या Dosing मुळे ॲलम मिश्रीत गाळ जमा होतो. सदरचा गाळ जास्त जमा झाल्यास CLF Bridge ला फिरण्याकरीता अडथळा येतो. तसेच पावसाळा जवळ आला असुन सदरचा गाळ साफ न केल्यास पावसाळयामध्ये अशुध्द पाणी Settle होण्यास अडथळे येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाळयापुर्वी CLF टँक साफ करणे आवश्यक आहे. अश्याच प्रकारे काशिदकोपर येथील MBR साफ सफाई करण्याकरीता निविदा मागविली असता ०.०४५/- ( GST सह) प्रति लिटर दर प्राप्त झाला असुन मा. आयुक्त यानी सदरच्या दरास मंजूरी दिली आहे. सदरच्या मंजुर दराने चारही CLF टँकची साफ सफाई करीता रक्कम रु.९,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा “ **सुर्या योजना देखभाल दुरुस्ती** ” या लेखाशिर्षातुन भागविणे शक्य आहे.

महाराष्ट्र शासन सार्व. बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी – २०१७ / प्र. क्र. ८ / इमा – २ दि. २०/०५/२०२१ अन्वये रु. १० लक्ष पर्यंत व्दि लखोटा पध्दतीने निविदा मागविण्याची मुभा आहे. त्या अनुषंगाने वसई – विरार महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे कामी रक्कम रु.९.९० लक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव व व्दि लखोटा

पध्दतीने निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे.

---

**ठराव :-**

१. वसई – विरार शहर महानगरपालिका सुर्या (टप्पा १ व ३ ) पाणी पुरवठा योजनेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर साफ करणे कामी तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रु.९,९०,०००/- खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीएटी – २०१७ / प्र.क्र. ८ / इमा – २, दि. २०/०५/२०२१ अन्वये रु. १० लक्ष पर्यंत व्दि लखोटा पध्दतीने निविदा मागविण्याची मुभा असल्याने सदर कामी व्दि लखोटा पध्दतीने निविदा मागविण्यास व अनुषंगीक होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी-०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५० २५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. २२२

विधी :- विधी
दिनांक :-१४/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय** :- महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त वकील व सिनियर काऊंसिलर यांची तीन वर्षाकरीता नेमणूक करणे तसेच विधी पॅनेलवरील वकिलांना सुधारित फी चे दर लागु करणेबाबत...

**प्रस्तावाचा मजकुर** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि.३ जुलै, २००९ रोजी ४ नगरपरिषदा व ५३ ग्रामपंचायती मिळून झालेली आहे. महानगरपालिका स्थापनेपुर्वी कार्यरत असलेले वकीलांचे पॅनल मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४ दि.१३/१०/२०१७ अन्वये रद्द करून नव्याने वकीलांचे पॅनल पुर्नगठन करण्याचे महानगरपालिकेने ठरविले होते. त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवुन मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३०४ दि.११/०९/२०१९ नुसार महानगरपालिकेच्या विधी पॅनेलवर खालीलप्रमाणे वकीलांची तीन वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वकील/सिनियर काऊंसिलरचे नांव | नियुक्ती नव्याने/फेरनियुक्ती | ज्या न्यायालयात नियुक्ती करण्यात आलेली आहे ते न्यायालय |
|---|---|---|---|
| १. | ॲड.स्वप्निल भदाने | नव्याने | वसई न्यायालयातील पॅनल |
| २. | ॲड.पुष्पक राऊत | नव्याने | वसई न्यायालयातील पॅनल |
| ३. | ॲड.योगेश विरारकर | नव्याने | वसई न्यायालयातील पॅनल |
| ४. | ॲड.संतोष खळे | फेर नियुक्ती | वसई न्यायालयातील पॅनल |
| ५. | ॲड.सुहास कुमार कदम | नव्याने | मा.सर्वोच्च न्यायालय पॅनल |
| ६. | ॲड.बांसुरी स्वराज | फेर नियुक्ती | मा.सर्वोच्च न्यायालय पॅनल |
| ७. | ॲड.अतुल दामले **(सिनियर काऊंसिलर)** | फेर नियुक्ती | मा.उच्च न्यायालय पॅनल |
| ८. | ॲड.राजेश दातार | फेर नियुक्ती | मा.उच्च न्यायालय पॅनल |
| ९. | ॲड.अमोल बावरे | फेर नियुक्ती | मा.उच्च न्यायालय पॅनल |
| १०. | ॲड.स्वाती सागवेकर | फेर नियुक्ती | मा.उच्च न्यायालय पॅनल |
| ११. | ॲड.सॅल्वीया डिसोजा | नव्याने | कामगार/औद्योगिक न्यायालय पॅनल |

नव्याने नियुक्त व फेर नियुक्त केलेल्या वकीलांना दि.१९/०९/२०१९ रोजीने तीन वर्षाकरीता नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उक्तपैकी वसई न्यायालयातील महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील ॲड.संतोष खळे यांनी वैद्यकिय कारणांस्तव महानगरपालिकेच्या विधी पॅनलमधुन राजीनामा देत असलेबाबत दि.१०/०९/२०२० रोजीने पत्र सादर केलेले आहे.

भौगोलिक रचनेनुसार वसई-विरार हे शहर पश्चिम रेल्वेमार्ग व राज्य महामार्गाने प्रमुख शहरांना जोडलेले आहे. तसेच मोठया औद्योगिक संकुलांमुळे वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासुन शहराच्या हद्दीमध्ये झपाटयाने नागरिकीकरण झालेले आहे. वाढत्या नागरिकरणा सोबतच महानगरपालिकेच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या दाव्यांच्या संख्येमध्ये देखील लक्षणीय वाढ झालेली आहे. मा.न्यायालयात दाव्यांच्या वाढलेल्या संख्येमुळे नियुक्त पॅनलवरील वकील/सिनियर काऊंसिलर यांना दाव्यातील युक्तीवाद करण्यासाठी मा.न्यायालयात उपस्थित राहणे

जिकरीचे होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे परिणामी दाव्यांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांचेसमवेत झालेल्या चर्चेअंती मा.महोदयांनी महानगरपालिकेच्या विधी पॅनेलवर आवश्यकतेनुसार अतिरिक्त वकील व सिनियर काऊंसिलर यांची नेमणूक करणेचे तोंडी निर्देश दिलेले आहेत.

तथापि, मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३०४ दि.११/०९/२०१९ चे अवलोकन केले असता, पॅनलवर आणखी काही विधी सल्लागार नेमण्याची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून अतिरिक्त पॅनलवरील विधी सल्लागार नेमण्याचे तसेच पॅनलमधील एखाद्या विधी सल्लागाराचे कामकाज असमाधानकारक असल्यास त्यास पॅनलमधून काढुन टाकण्याचे अधिकार मा.आयुक्त महोदय यांस देण्यात आलेले आहेत. असे जरी असले तरी सद्यपरिस्थितीत महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांचा कार्यकाळ माहे जुन २०२० पासुन संपुष्टात आलेला असुन सद्यस्थितीत महानगरपालिकेची स्थायी समिती सभा, सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाहीत. करीता महाराष्ट्र शासनाने मा.राज्यपाल यांच्या आदेशान्वये मा.आयुक्त सो. यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेची स्थायी समिती, सर्वसाधारण समिती यांचे पूर्णाधिकार मा.प्रशासक महोदय यांस प्राप्त झालेले आहेत.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर पुढीलप्रमाणे अतिरिक्त वकील/सिनियर काऊंसिलर यांची आवश्यकता आहे;

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | वकील/सिनियर काऊंसिलर आवश्यक संख्या |
|---|---|---|
| १. | मा.उच्च न्यायालय | वकील - दोन<br>सिनियर काऊंसिलर - एक |
| २. | मा.कामगार व औद्योगिक न्यायालय | वकील - एक |
| ३. | मा.मानवी हक्क आयोग (Human Rights Commission) | वकील - एक |
| ४. | Slum Tribunal | वकील - एक |
| ५. | Consumer Disputes Redressal Comission | वकील - एक |
| ६. | NGT (National Green Tribunal) | वकील - एक |
| ७. | NCLT (National Company Law Tribunal) | वकील - एक |
| ८. | MACT (Motor Accidents Claims Tribunal) | वकील - एक |
| ९. | MAT (Maharashtra Administrative Tribunal) | वकील - एक |
| १०. | मा.वसई न्यायालय | वकील - एक |

आवश्यकतेनुसार महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर नविन वकीलांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन इच्छूक उमेदवारांची निवेदने मुदतीत स्विकारणे योग्य वाटते. करीता विधी पॅनेलवरील वकील व सिनियर काऊंसिलर यांस लागू असलेले फी च्या दरांना देखील प्रसिध्दी द्यावी लागणार आहे. परंतु कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता त्यांच्या मुलाखती ऑनलाईन पध्दतीने घेऊन पात्र वकीलांची नियुक्ती करणे उचित होईल. सिनियर काऊंसिल हे त्यांच्या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी असल्याने त्यांची मुलाखत घेणे उचित नसुन याबाबत मा.आयुक्त महोदय यांचा निर्णय अंतिम राहिल. नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या वकील/सिनियर काऊंसिलर यांना सद्यपरिस्थितीत आहे त्या दराने फी चे दर लागु करणे इष्ट वाटत आहे. परंतु यापुर्वी च्या ठराव क्र.४ दि.१३/१०/२०१७ रोजीच्या फी धोरणासंदर्भातील ठरावात काही न्यायाधिकरणां करीता वकीलांच्या फी दराचा उल्लेख नसले कारणाने त्या प्रकरणी वकीलांच्या दराबाबत प्रत्येक वेळेस ठराव घेऊन मान्यता घ्यावी लागत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील वकीलांना खालीलप्रमाणे न्यायाधिकरण निहाय फी चे दर प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| मा.लवाद न्यायाधिकरण (Arbitration Tribunal) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे टप्पे | प्रस्तावित फी दर एकुण रूपये |
| १. | महानगरपालिकेच्या वतीने शपथपत्र/प्रतिज्ञापत्र/लेखी जबाब/पुरावे/दस्तऐवज इ. दाखल करणेकरीता | १५,०००/- |
| २. | प्रत्येक सुनावणीस हजर राहणेकरीता | १५,०००/- |

| मा.न्यायाधिकरणे (Tribunals) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | प्रस्तावित फी दर एकुण रूपये |
| १. | NGT (National Green Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | २५,०००/- |
| ३. | NCLT (National Company Law Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | २५,०००/- |
| २. | MAT (Maharashtra Administrative Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | १५,०००/- |

तसेच यापुर्वीच्या ठरावात काही प्रकरणी मंजुर दर हे तुलनेने अल्प असलेकारणाने त्या दाव्यांच्या बाबतीत वकीलांचा तितकासा प्रतिसाद मिळत नसुन खालीलप्रमाणे सुधारीत दर मंजुरीस प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| मा.न्यायाधिकरण/आयोग (सुधारीत दरांबाबत) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | दाव्यांचे प्रकार | कामाचे टप्पे | जुने फी दर एकुण रूपये | प्रस्तावित फी दर एकुण रूपये |
| १. | Slum Tribunal | निकाल लागलेनंतर देय | ८,०००/- | १५,०००/- |
| २. | Consumer Disputes Redressal Comission | निकाल लागलेनंतर देय | ८,०००/- | १५,०००/- |
| ३. | Human Rights Commission | निकाल लागलेनंतर देय | ८,०००/- | १५,०००/- |
| ४. | MACT (Motor Accidents Claims Tribunal) | निकाल लागलेनंतर देय | ८,०००/- | १५,०००/- |

तथापि एखाद्या प्रकरणाच्या गांभिर्याप्रमाणे सिनियर काऊंसिलरच्या दरामध्ये वाटाघाटी करून चढ-उतार करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव असतील. त्याचप्रमाणे भविष्यात महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी मंजुर करण्यात येणारे सुधारित फी चे दर वकील/सिनियर काऊंसिलर यांस लागु करणे योग्य राहिल. सदरचा खर्च अर्थसंकल्पातील **'दावे आणि खटले फी'** व इतर अनुषंगिक लेखाशिर्षाखाली करता येईल.

तरी मा.उच्च न्यायालयात दोन वकील, एक सिनियर काऊंसिलर, मा.कामगार व औद्योगिक न्यायालयात एक वकील, मा.मानवी हक्क आयोगाकरीता एक वकील, Slum Tribunal करीता एक वकील, Consumer Disputes Redressal Comission करीता एक वकील, NGT (National Green Tribunal) करीता एक वकील, NCLT (National Company Law Tribunal) करीता एक वकील, MACT (Motor Accidents Claims Tribunal) करीता एक वकील, MAT (Maharashtra Administrative Tribunal) करीता एक वकील व मा.वसई न्यायालयात एक वकील यांची महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर तीन वर्षाकरीता नियुक्ती करण्याच्या दृष्टीने जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन इच्छूक वकीलांची निवेदने मागविणे तसेच महानगरपालिकेच्या विधी पॅनेलवरील वकिलांना उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे सुधारित फी चे दर लागु करणेबाबत व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रस्तावित प्रमाणे मा.उच्च न्यायालयात दोन वकील, एक सिनियर काऊंसिलर, मा.कामगार व औद्योगिक न्यायालयात एक वकील, मा.मानवी हक्क आयोगाकरीता एक वकील, Slum Tribunal करीता एक वकील, Consumer Disputes Redressal Comission करीता एक वकील, NGT (National Green Tribunal) करीता एक वकील, NCLT (National Company Law Tribunal) करीता एक वकील, MACT (Motor Accidents Claims Tribunal) करीता एक वकील, MAT (Maharashtra Administrative Tribunal) करीता एक वकील व मा.वसई न्यायालयात एक वकील यांची महानगरपालिकेच्या विधी पॅनलवर तीन वर्षाकरीता नियुक्ती करण्याच्या दृष्टीने जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर तसेच वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन इच्छूक वकीलांची निवेदने मागविणे तसेच महानगरपालिकेच्या विधी पॅनेलवरील वकिलांना उपरोक्त प्रस्तावित प्रमाणे सुधारित फी चे दर लागु करणेबाबत व त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

14/6/2021

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २२३

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०६/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये कचरा विलगीकरण (Trommel) मशीन करीता शेड बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मध्ये वॉर्ड क्र.८८ मध्ये भोयदापाडा येथील डंम्पींग ग्राऊंड मध्ये महापालिका क्षेत्रातील काचरा टाकण्यात येतो. सदर ठिकाणी सुमारे ६५० ते ७०० टन इतका कचरा प्रतिदिन येतो.

डंम्पींग ग्राऊंड अंतर्गत असलेला जूना कचरा विलगीकरण करणेकरीता २५मीमी साईझचे २ विलगीकरण मशीन बसविण्यात आलेले आहेत व १०० मीमी साईझचे विलगीकरण मशीन १५ दिवसात बसविण्यात येणार आहे. तरी सदरचे विलगीकरण मशीन डंम्पींग ग्राऊंड मध्ये उघडया अवस्थेत असल्याने पावसाळया दरम्यान मशीन गंजणे व विद्युत मोटार खराब होण्याची शक्यता आहे.

तरी वरील बाबी लक्ष्यात घेता विलगीकरण मशीन करिता शेड बांधणे आवश्यक आहे.त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.५४,५१,४३२/- चे सन २०१९-२० च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये कचरा विलगीकरण (Trommel) मशीन करीता शेड बांधणे कामी रक्कम रू.५४,५१,४३२/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २२४

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये कचरा विलगीकरण (Trommel) मशीन करीता शेड बांधणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी मध्ये वॉर्ड क्र.८८ मध्ये भोयदापाडा येथील डंम्पींग ग्राऊंड मध्ये महापालिका क्षेत्रातील काचरा टाकण्यात येतो. सदर ठिकाणी सुमारे ६५० ते ७०० टन इतका कचरा प्रतिदिन येतो.

डंम्पींग ग्राऊंड अंतर्गत असलेला जूना कचरा विलगीकरण करणेकरीता २५मीमी साईझचे २ विलगीकरण मशीन बसविण्यात आलेले आहेत व १०० मीमी साईझचे विलगीकरण मशीन १५ दिवसात बसविण्यात येणार आहे. तरी सदरचे विलगीकरण मशीन डंम्पींग ग्राऊंड मध्ये उघडया अवस्थेत असल्याने पावसाळया दरम्यान मशीन गंजणे व विद्युत मोटार खराब होण्याची शक्यता आहे.

तरी वरील बाबी लक्ष्यात घेता विलगीकरण मशीन करिता शेड बांधणे आवश्यक आहे.त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.५४,५१,४३२/- चे सन २०१९-२० च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सबब उपरोक्त ठिकाणी विलगीकरण मशीन करीता शेड बांधण्याचे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता **मे.हमिद जे शेख** या नोंदणीकृत ठेकेदारकडून राज्य दर सूची पेक्षा १०% कमी दरा नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधिल भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडमध्ये कचरा विलगीकरण (Trommel) मशीन करीता शेड बांधणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता **मे.हमिद जे शेख** या नोंदणीकृत ठेकेदारकडून राज्य दर सूचीपेक्षा १०% कमी दरानुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


विभाग - सामान्य प्रशासन

प्रशासकीय ठराव क्र. २२५

दिनांक - १६/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील आचोळे बाजार दैनंदिन कर वसुलीस दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **आचोळे दैनंदिन बाजार कर** वार्षिक ठेका सन २०१७-१८ (दि. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८) या वर्षाकरिता **श्री. प्रदिप निपाणे** यांचे नावे रक्कम रु. ४३,६४,९००/- मंजुर करणेंत आला होता. सदर ठेक्याची मुदत दि. ३१ मार्च २०१८ रोजी संपलेली असून **श्री. प्रदिप निपाणे** यांनी या ठेक्याची पुर्ण रक्कम भरणा केलेली आहे. तद्नंतर सन २०१७-१८ या वर्षाच्या रक्कमेवर १०% वाढ करुन रु. ४७,६४,९००/- या अपेक्षित रक्कमेवर सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षांसाठी आचोळे बाजार कर वसुलीचा ठेका **आर. एस.इंटरप्रायजेस** यांचे नावे रक्कम रु. ४९,१९,९००/- या रक्कमेस **आचोळे बाजार** मंजुर करणेंत आला.

परंतु सदर ठेक्याच्या ई-निविदा प्रक्रियेस विलंब झाल्याने मागील मंजुर ठेकेदार **श्री. प्रदिप निपाणे** यांना निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत माहे १ एप्रिल २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत म्हणजेच ११ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेंत आलेली होती. संबंधित ठेकेराने बाजाराच्या अपेक्षित रक्कम रु. ४७,६४,९००/- या रक्कमेच्या ११ महिन्यांची अपेक्षित **रक्कम रु. ४३,६७,८२५/-** महानगरपालिका फंडात जमा केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ११ महिन्यांची भरणा करावयाची रक्कम रुपये | पावती क्रमांक | दिनांक | जमा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ४३,६७,८२५/- | ६७०१०२ | २२-०६-२०१८ | ७९४१५० |
| २ | | ६७०१०४ | २१-०८-२०१८ | ३९७०७५ |
| ३ | | ६७०१०६ | २६-०९-२०१८ | ३९७०७५ |
| ४ | | ६७०१०७ | १९-१०-२०१८ | ३९७०७५ |
| ५ | | ६७०१०९ | १५-११-२०१८ | ३९७०७५ |
| ६ | | ६७०११६ | १७-१२-२०१८ | ३९७०७५ |
| ७ | | ६७०११९ | ०३-०१-२०१९ | १९८५३७ |
| ८ | | ६७०१२० | ०७-०१-२०१९ | १९८५३८ |
| ९ | | ६७०१३० | ३०-०३-२०१९ | ११९१२२४ |
| | | | **एकुण** | **रु. ४३,६७,८२४/-** |

सदर बाजार ठेक्याची मुदत दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेली आहे. तथापि सन २०२० मध्ये जगभरात कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याने शासनाने लॉकडाऊन केल्याने सर्व बाजार बंद केलेले होते. त्यामुळे बाजार ठेकेदारांनी मागणी केल्यानुसार प्रशासकीय ठराव क्र. ६६४ दि. २६/०३/२०२१ अन्वये आचोळे बाजाराचे ठेकेदार **आर.एस.इंटरप्रायजेस** यांना दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३०/०६/२०२१ (तीन महिने) कलावधीकरिता आचोळे बाजार कर वसुलीमध्ये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याबाबत ठेकेदार यांनी केलेली मागणी व करावयाचे कार्यवाही बाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेंत येईल. तसेच संबंधित ठेकेदार यांनी १ मार्च २०१९ ते ३१ मार्च २०२१ (२५ महिने) या कालावधीतील बाजार कर वसुलीची संपुर्ण रक्कम रु. १,१७,७४,९६१/- महानगरपालिका फंडात भरणा केलेली आहे.

सबब आचोळे बाजार वसुलीचा ठेका यापुढील म्हणजेच दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देणे तातडीचे असल्याने नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

याकामी आचोळे बाजार कराची सन २०२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु. ५९,५३,०७९/- होत असून या रक्कमेवर प्रती वर्षी १०% वाढ करुन दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता होणाऱ्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| २०२१-२२ | दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२२ (१ वर्ष) | रु. ६५,४८,३८७/- (+ २ % आयकर ) |
| २०२२-२३ | दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३०/०६/२०२३ (१ वर्ष) | रु. ७२,०३,२२६/- (+ २ % आयकर ) |
| २०२३-२४ | दि. ०१/०७/२०२३ ते दि. ३०/०६/२०२४ (१ वर्ष) | रु. ७९,२३,५४९/- (+ २ % आयकर ) |
| एकुण रक्कम | | रु. २,१६,७५,१६२/- (+ २ % आयकर ) |

तरी आचोळे बाजाराची ई-निविदा प्रक्रिया करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना दैनिक वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस तसेच प्रशासकिय मान्यता घेणे याबाबत पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठरावाचा निर्णय** - वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील आचोळे बाजार दैनंदिन कर वसुलीस दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना दैनिक वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २२६ — विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - २६/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील निळेमोरे बाजार दैनंदिन कर वसुलीस दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील **निळेमोरे दैनंदिन बाजार कर** वार्षिक ठेका सन २०१७-१८ या वर्षाकरिता **मे. अंजली ट्रेडर्स** यांचे नावे रक्कम रु. ३२,७३,१६३/- मंजुर करणेंत आला होता. सदर ठेक्याची मुदत दि. ३१ मार्च २०१८ रोजी संपलेली असून **मे. अंजली ट्रेडर्स** यांनी या ठेक्याची पुर्ण रक्कम भरणा केलेली आहे. तद्नंतर सन २०१७-१८ या वर्षाच्या रक्कमेवर १०% वाढ करुन रु. ३६,००,५००/- या अपेक्षित रक्कमेवर सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षांसाठी निळेमोरे बाजार कर वसुलीचा ठेका **श्री. आफताब शेख** यांचे नावे रक्कम रु. ३६,०९,५०४/- या रक्कमेस मंजुर करणेंत आला.

परंतु सदर ठेक्याच्या ई-निविदा प्रक्रियेस विलंब झाल्याने मागील मंजुर ठेकेदार **मे. अंजली ट्रेडर्स** यांना निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुमारे ११ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदतवाढ देणेंत आलेली होती. संबंधित ठेकेराने बाजाराच्या अपेक्षित रक्कम रु. ३२,७३,१६३/- या रक्कमेच्या ११ महिन्यांची अपेक्षित **रक्कम रु. ३३,००,४५८/-** महानगरपालिका फंडात जमा केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | ११ महिन्यांची भरणा करावयाची रक्कम रुपये | पावती क्रमांक | दिनांक | जमा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | ३३,००,४५८/- | ६७०१०३ | २२-०६-२०१८ | ३०००४२ |
| २ | | ६७०१०५ | २६-०९-२०१८ | ९००१२६ |
| ३ | | ६७०१२३ | १३-०२-२०१९ | ८००००० |
| ४ | | ६७०१२४ | १५-०२-२०१९ | ८००००० |
| ५ | | ६७०१२५ | २५-०२-२०१९ | ५००२९४ |
| | | | **एकुण** | रु. ३३,००,४६२/- |

सदर बाजार ठेक्याची मुदत दि. ३१ मार्च २०२१ रोजी संपलेली आहे. तथापि सन २०२० मध्ये जगभरात कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याने शासनाने लॉकडाऊन केल्याने सर्व बाजार बंद केलेले होते. त्यामुळे बाजार ठेकेदारांनी मागणी केल्यानुसार प्रशासकीय ठराव क्र. ६६५ दि. २६/०३/२०२१ अन्वये निळेमोरे बाजाराचे ठेकेदार **श्री. आफताब शेख** यांना दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३०/०६/२०२१ (तीन महिने) कलावधीकरिता निळेमोरे बाजार कर वसुलीमध्ये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याबाबत ठेकेदार यांनी केलेली मागणी व करावयाचे कार्यवाहीबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेंत येईल. तसेच संबंधित ठेकेदार यांनी १ मार्च २०१९ ते ३१ मार्च २०२१ (२५ महिने) या कालावधीतील बाजार कर वसुलीची संपुर्ण रक्कम रु. ८६,३८,७४५/- महानगरपालिका फंडात भरणा केलेली आहे.

सबब निळेमोरे बाजार वसुलीचा ठेका यापुढील म्हणजेच दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

याकामी निळेमोरे बाजार कराची सन २०२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु. ४३,६७,४९९/- होत असून या रक्कमेवर प्रती वर्षी १०% वाढ करुन दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता होणाऱ्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| सन | कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| २०२१-२२ | दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२२ (१ वर्ष) | रु. ४८,०४,२४९/- (+ २ % आयकर ) |
| २०२२-२३ | दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३०/०६/२०२३ (१ वर्ष) | रु. ५२,८४,६७४/- (+ २ % आयकर ) |
| २०२३-२४ | दि. ०१/०७/२०२३ ते दि. ३०/०६/२०२४ (१ वर्ष) | रु. ५८,१३,१४१/- (+ २ % आयकर ) |
| एकुण रक्कम | | रु. १,५९,०२,०६४/- (+ २ % आयकर ) |

तरी निळेमोरे बाजाराची ई-निविदा प्रक्रिया करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना दैनिक वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस तसेच प्रशासकिय मान्यता घेणे याबाबत पुढील निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठरावाचा निर्णय** - वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील निळेमोरे बाजार दैनंदिन कर वसुलीस दि. ०१/०७/२०२१ ते दि. ३०/०६/२०२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ठेका पद्धतीने देणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेकामी जाहिर ई-निविदा सुचना दैनिक वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेस कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे.

16/6

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


विभाग - सामान्य प्रशासन

प्रशासकीय ठराव क्र. २२७ दिनांक - १६/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील डेरा तलाव, कोळबाव तलाव, आंबड तलाव, कुंभेर तलाव , भाटेला तलाव, नवाळे तलाव, भादले तलाव, एंडाळे तलाव, बाभळ तलाव, गणेश तलाव व वाटाण तलाव मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील तलाव लिलाव मत्स्यसंवर्धनासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

तथापि उप. मुख्य लेखा परिक्षक यांनी उपरोक्त तलावांच्या ठेक्याचा कालावधी ६ महिन्यांनी वाढलेला असल्यामुळे प्रतिवर्षी दरामध्ये होणारी वाढ त्या प्रमाणात वाढवून पुनःश्च अंदाजित रक्कम सुधारीत रक्कमेसह सादर करणेंस सुचविलेले आहे. एकंदरीत माहे जानेवारी २०२१ ते माहे मे २०२१ पर्यंतच्या कालावधीमध्ये कोरोना साथीचा प्रादुर्भाव असल्याने तसेच लॉकडाऊन सुरु असल्याने संबंधित ठेकेदार या कार्यालयाकडे येऊ शकले नाहीत. तसेच संबंधित ठेकेदारांना पुढील आर्थिक वर्षाकरिता १०% वाढ करुन रक्कम भरणेकरिता विचारणा केली असता, संबंधित ठेकेदारांनी यास असमर्थता दर्शविली असून यामुळे पुन्हा निविदा प्रक्रिया केल्यास यामुळे निविदा प्रक्रियेस विलंब होईल. म्हणून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता तलावाची मुदत १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये बदल करुन दि. १ जुलै २०२१ ते दि. ३१ मार्च २०२४ असा केल्यास एकूण ३३ महिन्यांच्या कालावधीकरिता तलाव लिलाव ठेका पद्धतीने देणे योग्य वाटते. सबब दि. १ जुलै २०२१ ते ३१ मार्च २०२४ या कलावधीकरिता ठेका देणेचे झाल्यास सदरचे तलावांची अपेक्षित रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकातील प्राप्त दर | ३३ महिन्यांची होणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | डेरा तलाव | ३०,०००/- | २७,५००/- |
| २ | कोळबाव तलाव | ५९,२००/- | ५४,२६७/- |
| ३ | आंबड तलाव | १,२४,०००/- | १,१३,६६७/- |
| ४ | कुंभेर तलाव | २,९१,७८६/- | २,६७,४७०/- |
| ५ | भाटेला तलाव | १,६७,२००/- | १,५३,२६७/- |
| ६ | नवाळे तलाव | १,५२,०००/- | १,३९,३३३/- |
| ७ | भादले तलाव | ५३,०००/- | ४८,५८३/- |
| ८ | एंडाळे तलाव | ८०,९९१/- | ७४,२४२/- |
| ९ | बाभळ तलाव | १६,५००/- | १५,१२५/- |
| १० | गणेश तलाव | ३८,५००/- | ३५,२९०/- |
| ११ | वाटाण तलाव | ४८,५००/- | ४४,४५८/- |

यामुळे महानगरपालिकेचे ज्यादा प्रमाणात आर्थिक नुकसान होणार नाही. तरी प्रशासकीय ठराव व पुढील कार्यवाही करणेकरिता निर्णय व आदेशास्तव सादर.

**ठरावाचा निर्णय-** वरील प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील डेरा तलाव, कोळबाव तलाव, आंबड तलाव, कुंभेर तलाव , भाटेला तलाव, नवाळे तलाव, भादले तलाव, एंडाळे तलाव, बाभळ तलाव, गणेश तलाव व वाटाण तलाव मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता तलावाची मुदत १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ या कलावधीमध्ये बदल करुन दि. १ जुलै २०२१ ते दि. ३१ मार्च २०२४ असा केल्यास एकूण ३३ महिन्यांच्या कालावधीकरिता तलाव लिलाव ठेका पद्धतीने देणे योग्य वाटत असून कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २२८ | विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - १६/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील डेवणी, विसराळे, बाग डोंगरी, मासळई, केळाम, काळी धोंड, डोंगरी लहान, सोज व बाडगुळे तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक मंजूर करणेबाबत..**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील **डेवणी, विसराळे, बाग डोंगरी, मासळई, केळाम, काळी धोंड, डोंगरी लहान, सोज व बाडगुळे तलाव** सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी जा.क्र.वविशम/साप्रवि/२९१ /२०२१ दि. २३/०२/२०२१ रोजी जाहिर दरपत्रक सुचना महानगरपालिकेच्या **vvcmc.in** या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई) च्या नोटीस बोर्डावर दि. २३/०२/२०२१ रोजी प्रसिद्ध करुन दि. ०१/०३/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत दरपत्रके मागविणेंत आली. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| १. | डेवणी तलाव | सैफ रफात डबरे | १७,५९२/- | ११,९००/- |
| | | मोहम्मद अरबाज युसुफ शहा | | १२,५००/- |
| | | **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** | | **१८,०००/-** |

वरील प्राप्त दरापैकी **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| २. | विसराळे तलाव | **दानिश शफिक डबरे** | २३,६६६/- | **२५,०००/-** |
| | | अरफात इरफान खान | | २४,०००/- |
| | | रविश शफिक डबरे | | २४,५००/- |

वरील प्राप्त दरापैकी **दानिश शफिक डबरे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ३. | बाग डोंगरी तलाव | **फैजान खालिद पटेल** | २२,९११/- | **२३,०००/-** |
| | | अतिक युसुफ डबरे | | १५,७८६/- |
| | | जोगेंद्र उमाशंकर चौहान | | १५,५००/- |

वरील प्राप्त दरापैकी **फैजान खालिद पटेल** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ४. | मासळई तलाव | **झेविअर आगुस्तीन फरगोज** | ४९,१५३/- | **५०,५००/-** |
| | | सॅरोस झेविअर फरगोज | | ४९,५००/- |
| | | सिल्वेस्टर आगुस्तीन फ़रगोज | | ५०,०००/- |

वरील प्राप्त दरापैकी **झेविअर आगुस्तीन फरगोज** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ५. | केळाम तलाव | मोहम्मद हुसैन युसुफ डबरे | ६९,९७९/- | ४६,५००/- |
| | | मोहम्मद अरबाज युसुफ शाह | | ४७,२००/- |
| | | **सैफ रफात डबरे** | | **७०,०००/-** |

वरील प्राप्त दरापैकी **सैफ रफात डबरे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ६. | काळी धोंड तलाव | मोहम्मद अरबाज युसुफ शहा | १४,९२८/- | १०,२००/- |
| | | मोहम्मद हुसैन युसुफ डबरे | | १०,०००/- |
| | | **सैफ रफात डबरे** | | **१५,०००/-** |

वरील प्राप्त दरापैकी **सैफ रफात डबरे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ७. | डोंगरी लहान तलाव | अतिक युसुफ डबरे | २१,८४०/- | १४,६००/- |
| | | **अभिजीत अरुण सुर्वे** | | **२२,७८६/-** |
| | | फैजान खालिद पटेल | | १४,७००/- |

वरील प्राप्त दरापैकी **अभिजीत अरुण सुर्वे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ८. | सोज तलाव | सैफ रफात डबरे | १७,२९४/- | ११,७००/- |
| | | मोहम्मद अरबाज युसुफ शाह | | ११,९००/- |
| | | **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** | | **१८,५००/-** |

वरील प्राप्त दरापैकी **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | दरपत्रकधारकाचे नाव | तलावाची किमान देकाराची निश्चित केलेली रक्कम | दरपत्रकधारकाचे प्राप्त दर |
|---|---|---|---|---|
| ९. | बाडगुळे तलाव | मिकी रोझारिओ | ५६,४३५/- | ५७,०००/- |
| | | अरफात इरफान खान | | ५६,७००/- |
| | | **विजय जोसेफ रुझारिओ** | | **५६,८००/-** |

वरील प्राप्त दरापैकी **विजय जोसेफ रुझारिओ** यांचे ज्यादा देकाराचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

तरी उपरोक्त तलावांचे प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी **डेवणी, विसराळे, बाग डोंगरी, मासळई, केळाम, काळी धोंड, डोंगरी लहान, सोज व बाडगुळे तलाव** ज्यादा देकाराच्या दरपत्रकातील दरास मान्यता देऊन ज्यादा दराच्या देकार धारकाबरोबर कामाची संविदा, करारनामा व कार्यादेश देणेकामी मान्यतेस्तव सादर.

**ठरावाचा निर्णय** - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील **डेवणी, विसराळे, बाग डोंगरी, मासळई, केळाम, काळी धोंड, डोंगरी लहान, सोज व बाडगुळे तलाव** सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी मागविणेंत आलेल्या दरपत्रकांतील ज्यादा दराच्या दरपत्रक धारकासोबत कामाची संविदा, करारनामा व कार्यादेश देणेस कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे.

**प्राप्त झालेले ज्यादा दराचे दरपत्रकधारक व त्यांचे दर**

| **अ.क्र.** | **तलावाचे नाव** | **दरपत्रक धारकाचे नाव** | **दरपत्रकातील ज्यादा देकाराचे दर** |
|---|---|---|---|
| १. | डेवणी तलाव | **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** | **१८,०००/-** |
| २. | विसराळे तलाव | **दानिश शफिक डबरे** | **२५,०००/-** |
| ३. | बाग डोंगरी तलाव | **फैजान खालिद पटेल** | **२३,०००/-** |
| ४. | मासळई तलाव | **झेविअर आगुस्तीन फरगोज** | **५०,५००/-** |
| ५. | केळाम तलाव | **सैफ रफात डबरे** | **७०,०००/-** |
| ६. | काळी धोंड तलाव | **सैफ रफात डबरे** | **१५,०००/-** |
| ७. | डोंगरी लहान तलाव | **अभिजीत अरुण सुर्वे** | **२२,७८६/-** |
| ८. | सोज तलाव | **मोहम्मद हुसैन युसुफ डबरे** | **१८,५००/-** |
| ९. | बाडगुळे तलाव | **विजय जोसेफ रुझारिओ** | **५६,८००/-** |

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २२९

विभाग :- बांधकाम

दिनांक :१६/०६/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी शेड बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिालका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी सद्यस्थितीत असलेली शेड अपुरी पडत असल्याने लसीकरणासाठी येणाऱ्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात नवीन शेड बांधणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रु. २६,४५,२९९/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी शेड बांधणे कामी अंदाजपत्रकीय रु. २६,४५,२९९/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ , फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** २२० **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** १६ / ०६ / २०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी शेड बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी सद्यस्थितीत असलेली शेड अपुरी पडत असल्याने लसीकरणासाठी येणाऱ्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात नवीन शेड बांधणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी जागेची पाहणी करून रक्कम रू. २६,४५,२९९/- चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे.

सबब, उपरोक्त ठिकाणी लसीकरणासाठी येणाऱ्या नागरीकांच्या सोईच्या दृष्टीने नवीन शेड बांधणेचे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता मे. अरविंद एंटरप्रायझेस रा.- वसई (पूर्व) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मधील जुचंद्र माता बाल संगोपन केंद्राच्या आवारात कोवीड -१९ च्या लसीकरणासाठी शेड बांधणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ संविदा २.२ नुसार निविदा न काढता मे. अरविंद एंटरप्रायझेस रा.- वसई (पूर्व) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो.. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 239

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** 16 /06 **/ 2021**

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे.

प्रस्तावाचा मजकूर

वसई- विरार शहर महानगरपालका कार्यक्षेत्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तसेच रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता कोव्हीड हॉस्पिटलची आवश्यकता आहे. हॉस्पिटलच्या इमारतीचे बांधकाम झाल्यास त्यामध्ये रूग्णांसाठी ऑक्सिजन बेडची व्यवस्था करणे शक्य होईल. तरी एकूण परिस्थिती लक्षात घेता रूग्णांच्या सोयीच्या दृष्टीने प्रभाग समिती (ई) मधील कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे आवश्यक आहे.

सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू.98,42,248/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) क अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेचे सादर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

अंदाजपत्रकीय रक्कम – :- रू. 98,42,248/-

दरसुची :- 2019-20

कामाचे स्वरूप :- जुन्या ओटयांचे विट बांधकाम व आर.सी.सी. स्लॅब तोडणे, फ्लोअरींगचे जुने टाईल्स तोडणे, सोलींग, पी.सी.सी., मुरूम भराव, आर.सी.सी. लिंटल्स, वीट बांधकाम, आतील बाहेरील प्लास्टर, एम.एम. पत्राशेड, व्हॅली गटार (पन्हाळी), एम.एस.ग्रील, कोलॅप्सीबल गेट, दुसऱ्या मजल्यावर आर.ओ.प्लांटसाठी केबीन, रोलींग शटर, वॉल पुट्टी, आतील व बोहरील रंगकाम, प्लंबीगं वर्क, सिंन्टेक्स टाकी, फ्लोरींग, डॅडो वॉल टाईल्स, शौचालय, बाथरूम, दरवाजे, ॲल्युमिनियम खिडक्या, चेकर्ड टाईल्स, हॅण्ड वॉश स्टेशन, एफ.आर.पी. शिटस्, प्लायवूड व सनमायकाचे पॅनल्स, इ. कामे.

मालकी :- व.वि.श.म.

विकास :- अ) लेखाशिर्ष –

आराखडयातील ब) मुळतरतुद-

क) शिल्लक -

आरक्षण ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. 01 पृठ क्र. 133 अं. क. 02

स्थावर मालमत्ता :- पृ क्रमांक अ.क्रमांक वर नोंद

नोंदवही क्रमांक

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे कामी रक्कम रू. 98,42,248/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 232

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** 16 /06/ **2021**

---

| | | |
|---|---|---|
| प्रस्तावाचा विषय | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणे. |
| प्रस्तावाचा मजकूर | | वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तसेच रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता नव्याने कोव्हीड हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. सदर हॉस्पिटलच्या इमारतीभोवती कंपाऊंड वॉल, पत्र्याचे शेड, पाण्याची टाकी बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे गरजेचे आहे. तसेच जनरेटर सुरक्षित ठेवणेसाठी कठडयाचे बांधकाम करणे तसेच इटीपी प्लांट व ऑक्सिजन निर्मिती करणेसाठीच्या प्लांटसाठी आवश्यक कठडा व पत्र्याची शेड करणे आवश्यक आहे.<br>सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 1,78,13,497/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.<br>सबब वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पत्र्याचे शेड, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणेचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) क अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेचे सादर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर. |
| अंदाजपत्रकीय रक्कम – | :- | रू. 1,78,13,497/- |
| दरसुची | :- | 2019-20 |
| कामाचे स्वरूप | :- | खोदकाम, सोलींग, पी.सी.सी., मुरूम भराव, आर.सी.सी. फूटींग, आर.सी.सी. राफ्ट, आर.सी.सी. बीम, आर.सी.सी. कॉलम, आर.सी.सी. पडदी, आर.सी.सी. स्लॅब, दगड बांधकाम, वीट बांधकाम, आतील बाहेरील प्लॅस्टर, वॉटर प्रूफींग प्लॅस्टर, एम.एस.पत्राशेड, व्हॅली गटार (पन्हाळी) कंपाऊंड वॉल, एम.एस.ग्रील, एम.एस.मुख्य गेट व साईड गेट, कोलॅप्सीबल गेट, जनरेटर प्लॅटफॉर्म (इमारतीसाठी), जनरेटर प्लॅटफॉर्म (ऑक्सिजन सिलेंडरसाठी), प्लॅटफॉर्म (ई.टी.पी. प्लँटसाठी), प्लॅटफॉर्म (ऑक्सिजन प्लँटसाठी), प्लॅटफॉर्म व केबीन (ट्रान्सफॉर्मर साठी), प्लॅटफॉर्म (डी.पी.साठी), प्लॅटफॉर्म आर.ओ.कुलरसाठी, मुख्य गेट लगत बैठक व्यवस्था, मागील शेडकडे बैठक व्यवस्था, वॉल पुट्टी, कंपाऊंड, ऑक्सिजन जनरेटर प्लॅटफॉर्म, इटीपी प्लँट प्लॅटफॉर्मचे रंगकाम, , पाण्याची टाकी, सेप्टीक टँक, फ्लोरींग, डॅडो टाईल्स, ग्रॅनाईट चेकर्ड टाईल्स, पेव्हर ब्लॉक, आर.सी.सी. पाईप क्रॉसींग, आर.सी.सी. पाईप (आऊटलेट गटारासाठी), मुख्य प्रवेशद्वाराजवळ व शौचालयाबाहेर रॅम्पची व्यवस्था, इ. अनुषंगीक कामे. |

मालकी :- व.वि.श.म.

विकास :- अ) लेखाशिर्ष –

आराखडयातील ब) मुळ तरतुद-

आरक्षण क) शिल्लक -

ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. 01 पृठ क्र. 133 अं. क. 02

स्थावर मालमत्ता नोंदवही क्रमांक :- पृ क्रमांक अ.क्रमांक वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणे कामी रक्कम रू. 1,78,13,497/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

ठराव क्र. २३३ | विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :१६/६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी अतिरिक्त तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) पॅनलवर नियुक्ती करणे.

सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बऱ्याच जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीं अस्तित्वात आहेत. सदर इमारती निष्कसीत करणेचे काम सहा. आयुक्तांमार्फत सुरु आहे. सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे, त्यांना निष्कसन करणेबाबत मा. आयुक्त महोदय ह्यांनी सुचना दिलेल्या आहेत.

सदर इमारतींचे संरचनात्मक संरक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणे करीता इमारतींचे सर्वेक्षण करुन स्टॅबिलिटी सर्टिफिकेट देणेकरीता रु. ०.९०/- प्रति चौ. फुट तसेच इमारत नादुरुस्त आढळल्यास त्यात दुरुस्त्या सुचवून दुरुस्त्या नुसार केलेल्या अंमलबजावणीची पहाणी करुन स्टॅबिलीटी सर्टीफिकेट सादर करणे इ. सर्व रु. ३,०००/- प्रती ५०० चौ. फुट या निम्नत्तम दराने काम करणेस तयार असणाऱ्या स्थापत्य अभियंत्यांचे पॅनल नियुक्त करणेस मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १०६५ दि. २६/११/२०१३ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर मंजूरीनुसार महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दरानुसार काम करणेस इच्छुक असणाऱ्या ७ स्थापत्य अभियंत्यांची वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरिक्षण करणेकरीता पॅनलवर नियुक्ती करणेत आली आहे.

तरी पण वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बऱ्याच जुन्या व मोडकळीस असलेल्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकरीता पॅनलवर अतिरीक्त

तज्ञ स्थापत्य अभियंता / सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. त्याकरीता तज्ञ पदवीधर स्थापत्य अभियंता / सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांच्याकडून खालील नमुद मंजूर दरानुसार स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी जाहिर सुचना प्रसिध्द करुन अर्ज मागविणे आवश्यक आहे.

१) इमारतीचे सर्वेक्षण करुन स्टॅबिलीटी सर्टीफिकेट देणे. — रु. ०.९० प्रती चौ. फुट

२) इमारत नादुरुस्त आढळल्यास त्यात दुरुस्त्या सुचवून दुरुस्त्या नुसार केलेल्या अंमलबजावणीची पहाणी करुन स्टॅबिलीटी सर्टीफिकेट सादर करणे इ. सर्व कामांसाठी — रु. ३,०००/- प्रती ५०० चौ. फुट व त्यावरील वाढीव क्षेत्रासाठी प्रती चौ. फुट करीता वरील रक्कमेच्या प्रमाणात.

तरी सदर कामी अतिरिक्त इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता / सल्लागार (कंन्सल्टन्ट) यांना मंजूर दरानुसार स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी जाहिर सुचना प्रसिध्द करुन लेखी अर्जाव्दारे पॅनलवर नियुक्ती करुन घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करणेसाठी अतिरिक्त इच्छुक अनुभवी पदवीधर तज्ञ स्थापत्य अभियंता/ सल्लागार (कंन्सलटंन्ट) यांच्याकडून मंजूर दरानुसार पॅनलवर स्ट्रक्चरल ऑडीट करणे कामी नियुक्त करणेसाठी जाहिर सुचना प्रसिध्द करुन अर्ज मागविणेकामी मंजूरी देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २३४ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १६/०६/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास नवजात बालकांच्या रुग्णालयाकरिता आवश्यक PPE Kit विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेस व याकामी येणा-या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार कौलसिटी -वसई, व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे समर्पित कोविड - केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. शासनामार्फत तसेच संभाव्य येणारी तिसरी लाट यामध्ये लहान मुले संक्रमित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी पुढिल कालावधीत लहान मूलांची विशेष काळजी घेण्याकरिता नवजात बालक व लहान बालके यांच्या उपचाराकरिता बोळींज, विरार (प) येथे नव्याने रुग्णालय उभारण्यात आले असुन सदर रुग्णालयाकरिता PPE Kit ची आवश्यकता आहे. याकरिता निविदा यादीमध्ये मंजुर असलेल्या घटकांची मागणी नोदविण्यात आलेली आहे. परंतु निविदा यादीत सामाविष्ट नसलेले तसेच समाविष्ट असुन पुरवठाधारक पुरवठा करण्यास असमर्थ असलेले उपकरणे व साहित्य स्थानिक पातळीवर त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. याकामी मे.धनानी फार्मा, पालघर, मे.फार्मा वर्ल्ड, मिरा रोड, मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस, पुणे या अधिकृत विक्रेत्याकडे उपलब्ध असून यांच्यामार्फत दर प्राप्त झाले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच सदर दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | मागणी | मे.धनानी फार्मा | मे.फार्मा वर्ल्ड | मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस | सर्वात कमी दर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PPE Kit | 50000 | 200 | 325 | 270 | 200 | 10000000 |
| | | | | | | GST 5% | 250000 |
| | | | | | | Total | 10500000 |

सद्यस्थितीत मे.धनानी फार्मा, पालघर, यांच्याकडील प्राप्त दर सर्वात कमी असुन यांच्याकडे वरील नमुद PPE Kit उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदरचे PPE Kit त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास PPE Kit खरेदी करणे कामी रू.१,०५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ वित्तिय वर्षाकरीता “ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती” या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरचे PPE Kit विनानिविदा खरेदी करणेकामी मे.धनानी फार्मा, पालघर, यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रू.१,०५,००,०००/- (अक्षरी- एक कोटी पाच लाख रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

11/6/2021

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. २३५ | विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-१८/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विम्याचे नुतनीकरण करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पुर्व) ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (पश्चिम) ५) सनसीटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (पश्चिम) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई अशी मिळुन एकुण ०७ अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागात कायम व ठेका कर्मचारी असे एकुण २२८ कर्मचारी कार्यरत आहेत तसेच समुद्र किनारी पर्यटकांचा सुरक्षेकरीता ९ जीवरक्षक कार्यरत आहेत. असे एकुण २३७ कर्मचारी आपल्या जिवाची जोखीम पत्करुन कर्तव्य बजावत आहेत. सदर कर्मचारी संपूर्ण वसई तालुका, भिवंडी, पालघर, बोईसर, एम.आय.डी.सी, नॅशनल हायवे, डहाणू, तलासरी, ई. ठिकाणी रासायनिक व इतर कंपन्यांमध्ये लागणाऱ्या आगी तसेच रहीवाशी इमारती मध्ये लागणाऱ्या आगी विझवणे व त्या ठिकाणी आगीत सापडलेल्या व्यक्तीचे व त्यांचे मालमत्तेचे आगी पासुन संरक्षण करणे तसेच झाड पडणे, अतिवृष्टीमुळे पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होणे अशा आणिबाणीच्या वेळी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात हे कर्मचारी सदरची कामे करत आहेत. अशा आणीबाणीच्या परिस्थितीत काम करत असतांना अग्निशमन जवानांना दुखापती सुध्दा होत असतात.

आग विझवित असतांना कर्मचा-यांना इजा, दुखापत अथवा दुर्देवी प्रसंग ओढावल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास मृत जवानांचे कुटूंब उघडयावर पडू नये व त्यांच्या वारसांना सुरक्षा म्हणुन काही रक्कम मिळणे आवश्यक आहे. अशी रक्कम मिळणेसाठी अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा उतरविणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातील कर्मचारी यांचा वार्षिक ग्रुप विमा मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८२१, दिनांक २८/०८/२०१४ रोजी मंजुरी घेऊन दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचेकडून अग्निशमन विभागातील कायम व ठेका अशा एकुण १७९ कर्मचा-यांचा ग्रुप विमा दिनांक ०३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. तसेच मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दिनांक २३/०३/२०१५ अन्वये दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचे कडून अग्निशमन विभागाच्या उर्वरीत ५८ कर्मचा-यांचा अपघाती विमा दिनांक ३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. अशा एकुण २३७ अग्निशमन कर्मचा-यांचा विमा काढण्यात आला होता.

सदर विमा योजने अंतर्गत विमाधारक कर्मचा-यास अपघात दुखापत झाल्यास संभाव्य वैद्यकिय खर्चाची रक्कम केलेल्या वैद्यकिय खर्चाची बिले सादर केल्यानंतर सदर रक्कम त्यास विमा कंपनीकडून प्राप्त होते. तसेच एखादा विमाधारक कर्मचारी याचा अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास निश्चित एक रक्कम विमा कंपनीकडून देण्यात येते.

सदरील विमा पॉलिसीची वार्षिक नुतनीकरणाची मुदत हि दिनांक १८/०६/२०२१ रोजी संपत आहे. या विमा योजने लाभा अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची यादी दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी यांना दिनांक १९/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये तपशीलवार कळविले होते. त्या अनुषंगाने विमा रक्कमेबाबत विमा कंपनीने दिनांक २८/०५/२०२१ रोजी ई-मेल व्दारे वार्षिक विमा हप्ताची एकुण रक्कम २४,००,०००/- भरणे बाबत कळविलेले आहे

तरी सदर पॉलिसीचे नुतनीकरण करणे करीता महानगरपालिकेचे सुधारित अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३१ वर १३ नंबरच्या लेखाशिर्षा मध्ये "अग्निशमन कर्मचारी विमा " यामध्ये एकुण वार्षिक रुपये २५,००,०००/- (पंचवीस लाख रुपये) एवढी तरतुद आहे.

तरी अग्निशमन विभागातील कायम व ठेका पध्दतीवरील कर्मचारी यांचा अपघाती ग्रुप विमा पॉलिसी नुतनीकरण करण्यास व त्याबाबत येणाऱ्या रक्कम रु. २४,००,०००/- पर्यंतचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

<u>ठराव :-</u> अग्निशमन विभागातील कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना आग विझवतांना इजा, दुखापत अथवा दुर्देवी प्रसंग ओढविल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास जवानांचे कुटूंब उघडयावर पडू नये व त्यांच्या वारसांना सुरक्षा म्हणून काही रक्कम मिळावी याकरीता अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचा ग्रुप विमा काढणे कामी व विमा हप्ता रक्कम रु. २४,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

17/6.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. २३६ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-१७/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता दोन नग युटिलीटी वाहन खरेदी करणेस येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे, २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.), ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व), ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.), ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवानमान, वसई (प.), ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गांव, ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) अशी एकुण सात अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

अग्निशमन विभागाने यापूर्वी दोन नग महिंद्रा कंपनीचे कॅम्पर मॉडेल युटिलीटी वाहने खरेदी केली असून त्याचा वापर कोवीड-१९ रुग्णालयांमध्ये दैनंदिन नाश्ता व दोन वेळचे जेवण पोहच करण्यासाठी होत आहे परंतू सदर दोन वाहने या कामासाठी अपूरी पडत आहेत. तसेच महापालिकेने बोळींज व नालासोपारा (प.) येथे कोवीड रुग्णालय तयार केली असून तेथे ही रुग्णांना जेवण नाश्ता पोहच करण्यांस एक वाहनाची आवश्यकता लागणार आहे.

अग्निशमन विभागाने पकडलेले साप, प्राणी व पक्षी जंगलात सुखरुप सोडणेकरिता एक युटिलीटी वाहनाची आवश्यकत आहे. सद्या सदर प्राणी, पक्षी व साप हे मुख्य अग्निशमन केंद्रातुन मोठया अग्निशमन वाहनाचा वापर करण्यात येतो. साप सोडण्यास अग्निशमन वाहन गेल्यावर जर शहरात मोठी दुर्घटना घडली तर मोठया वाहनांची कमतरता भासु शकते याकरिता अग्निशमन विभागाकडे स्वतंत्र युटिलीटी वाहन उपलब्ध करुन दिल्यास योग्य होईल. तसेच मोठया वाहनाचा खर्च कमी होईल तसेच आगीचे ठिकाणी कर्मचारी व साहित्य ने-आण करण्यास छोटया युटिलीटी वाहनाचा वापर करता येईल. या कामी भाडयाने वाहन उपलब्ध करुन घेतल्यास तो खर्च वाढतो त्याऐवजी स्वत:चे वाहन खरेदी करणे योग्य होईल.

तरी अत्यावश्यक सेवेसाठी दोन नग युटिलीटी वाहनांची आवश्यकता असून सदर वाहने जीएम पोर्टलवरुन खरेदी करणे योग्य होईल. जीएम पोर्टलवर महिंद्रा कंपनीचे कॅम्पर मॉडेलची प्रती वाहन रक्कम रु. ७,६७,०००/- किंमत असून दोन वाहनांसाठी रक्कम रु. १५,३४,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका सन २०२०-२१ च्या सुधारित अर्थसंकल्प सह सन २०२१-२२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. ५७ वरील ८ नंबरचे लेखाशिर्ष **"विकास निधीअंतर्गत अग्निशमन वाहन व अग्निशमन यंत्रणा असलेली मोटारसायकल व उंच शिडीसह इतर साहित्य खरेदी"** यामध्ये रक्कम रुपये ४० कोटी तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता दोन नग युटिलीटी वाहन जीएम पोर्टलवरुन ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे करीता येणा-या अंदाजित रक्कम रुपये १६,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** प्रस्तावित केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील रेस्क्यू केलेले पक्षी, प्राणी व सर्प यांना जंगलात सुखरुपरित्या सोडण्यासाठी अग्निशमन विभागास युटिलीटी वाहनाची आवश्यकता लागणार आहे करीता सदर २ नग वाहने ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रुपये १६,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**

**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** 237 **विभाग : बांधकाम विभाग**

**दिनांक : 17/06/ 2021**

---

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 82 मध्ये अलकापूरी येथील राजमाता नगर टर्न ते कालिका माता मंदिर पर्यंत अलकापूरी नाल्याकरीता संरक्षक भिंत बांधणे कामी प्राप्त् निविदांपैकी लघुत्त्म दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : - रू.71,45,232/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. स्थायी समिती सभा
दि. ठराव क्र.

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/बांध/शअ/785/2019-20
दि. 03/12/2019
शहर अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 05/12/2019
(जाहिर ई निविदा सुचना)

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :-
1)दै. प्रहार,
2)दै. द फ्रि प्रस जर्नल
3)दै. पूर्णविराम
4)दै. नवभारत
5)दै. मिड डे
6)दै. आपलामहानगर
7)दै. प्रात:काल

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 05/12/2019

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. 05/12/2019 दु.3.00 पासून ते 30/12/2019 दु. 3.00 वाजेपर्यंत

विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा :- 02

ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) दि. 07/01/2020 दु. 3.00 वाजता

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि.22/01/2020

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- 1. शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा | निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | मे. शशिकांत राजहंस | (-) 15.16 % | -- | |
| 2. | मे. महावीर एंटरप्रायजेस | (-) 11.11 % | -- | |

उपरोक्त् तक्याचे अवलोकन केले असता मे. शशिकांत राजहंस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.16 % कमी दराचा देकार हा इतर निविदा दरापेक्षा कमी आहे असून सदर निविदेकरीता निविदा समितीने दि ................ रोजीच्या बैठकीत मे. शशिकांत राजहंस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.16 % कमी दरास मंजूरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. शशिकांत राजहंस यांनी दिलेला देकार योग्य् व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार मे. शशिकांत राजहंस यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्त्व मा. आयुक्त तथा प्रशासक सो, यांच्या मंजूरीस्त्व सादर.

.................................................................................................................................

ठराव – उपरोक्त् कामी मे. शशिकांत राजहंस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15.16% कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी दिली आहे. सदर कामी महानगरपालिकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करून संविदा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी असे .

06-02

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 238

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 17/ 6 /2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पाणीपुरवठा विभागासाठीच्या तरतूदींच्या पूर्नविनियोजनास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- उपरोक्त विषयान्वये अ) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सुर्या टप्पा-३ पाणी पुरवठा योजना सन २०१७ मध्ये कार्यान्वित करण्यात आली असून सदर योजनेचे अंतिम देयक रू. ४.२५ कोटी ठेकेदारास प्रदानार्थ सादर करावयाचे असून या योजनेचे सल्लागार MJP यांचे सेवाशुल्क रू.१.९७ कोटी अदा करावयाचे आहेत. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाग -२ भांडवली खर्च मधील " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारीत १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना" या लेखाशिर्षावर रू.१.०० लक्ष इतकी तरतुद उपलब्ध असून वरील ठेकेदाराचे देयक रू. ४.२५ कोटी व MJP चे सेवा शुल्क रू. १.९७ असे एकूण रू. ६.२२ कोटी प्रदानास तरतुद अपुरी पडत आहे. याकरीता सदर लेखाशिर्षावर अन्य लेखाशिर्षातून तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

ब) वसई-विरार शहर महानगरपालिकेचे पाणी पुरवठ्याचे ५ झोन असून यापैकी A/C, B/E, G/H व I या चार झोनसाठी महापालिकेने स्वत: कडील युटीलीटी वाहन देखभाल दुरूस्तीकरीता उपलब्ध करून दिले आहे. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाग - १ महसुली खर्च आरोग्य सोयी व पाणीपुरवठा मधील " पाणी पुरवठा वाहन डिझेल" या लेखाशिर्षावर रू.१.०० लक्ष इतकी तरतुद ठेवण्यात आली असून सद्य:स्थितीत उपलब्ध तरतुद रू. ०.१७ लक्ष इतकी आहे. सदर वाहनांना लागणाऱ्या डिझेलची देयके अदा करण्यास निधी वर्ग करणे आवश्यक आहे. करीता सदर लेखाशिर्षावर अन्य लेखाशिर्षातून तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

अ) सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाग - २ भांडवली खर्च मधील " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारीत १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना" या लेखाशिर्षावर रू. ६.२२ कोटी "विकासनिधी अंतर्गत मुख्य पाणी पुरवठा योजना जलकुंभ" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुद रू. १० कोटी मधुन वर्ग करणे शक्य आहे.

ब) सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाग - १ महसुली खर्च आरोग्य सोयी व पाणीपुरवठा मधील " पाणी पुरवठा वाहन डिझेल" या लेखाशिर्षावर

रू. १५.०० लक्ष "सार्वजीक विहीरी गाळ काढणे व दुरूस्ती" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुद रू. ५०.०० लक्ष मधुन वर्ग करणे शक्य आहे.

तरी वरिल प्रमाणे अ) सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "विकासनिधी अंतर्गत मुख्य पाणी पुरवठा योजना जलकुंभ" या लेखाशिर्षावरून रू.६.२२ कोटी " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारीत १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना या लेखाशिर्षावर तसेच " ब) सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील " सार्वजीक विहीरी गाळ काढणे व दुरूस्ती " या लेखाशिर्षावरून रू. १५ लक्ष " पाणी पुरवठा वाहन डिझेल" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम ३० (३) नुसार सोबत जोडलेल्या नमुना नं. १० मधील विवरणपत्राप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव :-**

१. वरिल प्रमाणे अ) सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारीत १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना" या लेखाशिर्षावर तसेच ब) " पाणी पुरवठा वाहन डिझेल " या लेखाशिर्षावर तरतुद अपुरी पडत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार विभागाने तरतुद पुर्नविनियोजनाचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "विकासनिधी अंतर्गत मुख्य पाणी पुरवठा योजना जलकुंभ" या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुद रू. १०.०० कोटी मधून " महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारीत १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना" या लेखाशिर्षावर रू.६.२२ कोटी तसेच महसूली खर्चातील "सार्वजीक विहीरी गाळ काढणे व दुरूस्ती" या लेखाशिर्षावरून "पाणी पुरवठा वाहन डिझेल" या लेखाशिर्षावर रू. १५ लक्ष तरतूद पुर्नविनियोजन करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ नुसार तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ च्या नियम ३० (३) नुसार सोबत सादर केलेल्या नमुना नं. १० मधील विवरणपत्रास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

P/551

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. २३८ | विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : १७/०६/२०२१

.....................................................................................................................................

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मधील मजेठीया नाटयगृहाचे इन्टीरीअर डिझाईन व बांधकाम विषयक कामे करणे

प्रस्तावाचा मजकूर :-

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | :- | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मधील मजेठीया नाटयगृहाचे इन्टीरीअर डिझाईन व बांधकाम विषयक कामे करणे |
| लेखाशिर्ष | :- | विकासनिधी अंतर्गत नाटयगृह व सभागृह बांधणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- | रु. ३,६९,९३,१९९.००/- |
| अर्थसंकल्पीय तरतूद | :- | |
| प्रशासकीय मान्यता | :- | मा. आयुक्त तथा प्रशासक क्र. २६४ दि. ११/१२/२०२० |
| तांत्रिक मान्यता | :- | मा. शहर अभियंता यांची दि. ११/१२/२०२० |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी | :- | वविशम/शअ/बांध/ /२०२१ दि. शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका |
| वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि. | :- | दि. १३/१२/२०२० |
| वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक | :- | दै. महासागर, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. नवभारत, दै. आपले महानगर, दै. मिड डे, दै. प्रात:काल, दै. इंडीयन एक्सप्रेस |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख | :- | दि. १५/१२/२०२० ते ११/०१/२०२१ |
| ई - जाहिर निविदा सुचना प्रथम मुदतवाढ | | दि. ११/०१/२०२१ ते २१/०१/२०२१ |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा स्विकारण्याची तारीख | :- | दि. १९/३/२०२१ |
| विहीत मुदतीत ऑन लाईन प्रक्रियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०३ |
| तरतुद नियंत्रण रजिस्टर क्रं. १ | :- | |

प्राप्त निविदा समितीपुढे उघडली असून त्याचे दर पुढीलप्रमाणे:-

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | प्राप्त निवीदा दर |
|---|---|---|
| १. | मे. बरकत कॉन्ट्रक्टर | १७.००% कमी दराने |
| २. | मे. गजानन कंस्ट्रक्शन | ३०.००% जास्त दराने |
| ३. | मे. श्री. संतइंन्फ्रा | ११.०७% कमी दराने |

उपरोक्त निवीदांची तूलना करता मे. बरकत कॉन्ट्रक्टर हयांची निवीदा १७% कमी दराची प्राप्त झालेली आहे. सदर निविदेचे मे. बरकत कॉन्ट्रक्टर हयांची निवीदा १७% कमी दराची असुन तुलनात्मक दृष्टया इतर निविदा धारकांपेक्षा कमी असुन योग्य व वाजवी आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये उपरोक्त कमी दराची निविदा मंजूर करुन मे. बरकत कॉन्ट्रक्टर यांच्याशी कामाची निविदा संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तिय मान्यतेस्तव मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांच्या मंजूरीस्तव सादर.

..........................................................................................................................

ठराव :- उपरोक्त कामी मे. बरकत कॉन्ट्रक्टर हयांची निवीदा १७% कमी दराची निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशीर बाबीची पूर्तता करुन सविंधा करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** २४० 　　　　**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-**१७/०६/**२०२१**

---

विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करिता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन मंजूर निविदेकार मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेकामी होणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता दैनंदिन गटार सफाई यांत्रिक पध्दतीने करणकामी ६ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी प्रशासकीय ठराव क्र.४४२ दिनांक २८/०१/२०२१ नुसार प्रशासकीय मंजूरी घेऊन जाहिर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदरील निविदेत **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत करारनामा करुन जा.क्र.वविशम/आरोग्य/१३६/२०२१ दिनांक ०७/०५/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २४/०५/२०२१ रोजी ६ सक्शन कम जेटींग मशीन पुरवठा केला आहे. त्यानुसार सदरी मशीन गटार सफाईच्या कामास वापरण्यास सुरू केल्यानंतर सदरील मशीन गटार सफाईचे काम उत्तमरित्या करत असल्याने मा.आयुक्त सो. यांनी ३ अतिरिक्त सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. जेणेकरुन प्रत्येक प्रभागा मध्ये १ सक्शन कम जेटींग मशीन दिल्यास चांगल्याप्रकारे गटार सफाई होऊ शकते.

परंतु ६ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतली असल्याने व नव्याने ३ सक्शन कम जेटींग

मशीन खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया करणे ऐवजी **महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक :भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग- III /उद्योग-४ मधील ३.३.२** पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश सुरूवातीचा आदेश दिल्यानंतर ६ महिन्यांच्या काळावधीच्या पूर्वी देता येईल. पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देत येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरूवातीच्या आदेशाच्या **५०% किंवा रुपये दहा कोटी (रु.१० कोटी)** यापैंकी जे कमी असेल त्यापर्यंची खरेदी करता येईल. त्यानुसार सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील पुरवठादार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांना ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी पुनर्प्रत्ययी आदेश होणेस व प्रति सक्शन कम जेटींग मशीनसाठी **रक्कम रु.३८,८१,०००/-** प्रमाणे ३ मशीनसाठी **रक्कम रु.१,१६,४३,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी सोळा लक्ष त्रेचाळीस हजार मात्र)** एवढा खर्च होणार आहे.

सदरील खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **वाहन खरेदी/ रोड रोलर** खरेदी या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद **रक्कम रु.१४ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी **६ सक्शन कम जेटींग मशीन** खरेदीसाठी रक्कम **रु.२,३२,८६,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी बत्तीस लक्ष श्याऐंशी हजार मात्र)** एवढया रक्कमेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देऊन **३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी** रक्कम रु.१,१६,४३,०००/- असे मिळून **रक्कम रु.३,४९,२९,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी एकोणपन्नास लक्ष एकोणसतीस**

**हजार मात्र**) एवढया रक्कमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७३ (क) नुसार सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी व **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्यासोबत संविदा करणेस सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करिता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दिनांक ०९/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील ३.३.२ नुसार मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि. यांना मागील मंजूर दराने ३ अतिरिक्त सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी पुनर्प्रत्ययी आदेश देणेस तसेच होणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु.१,१६,४३,०००/- व पुरवठा केलेल्या ६ मशीनकरिता रक्कम रु.२,३२,८६,०००/- अशी एकुण रक्कम रु.३,४९,२९,०००/- इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच संविदा करणेस मान्यता देत आहे.**

16/6/2021

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

D:\Aarogy\All purches Item\vahan kharedi\suction cum jetting machin/Tipani

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४१ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १८/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना विषाणू(कोव्हीड-१९) प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अंमलबजावणी होत असल्याने महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड-१९ रुग्णालये, कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेटर व क्वारंटाईन सेंटर येथे कोव्हीड-१९ च्या कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा समाप्त होत असल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा समाप्ती करणे व १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन त्यांना पुढील ६ महिन्यासाठी मुदतवाढ देऊन आदेश देणेकामी तसेच याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) मा. प्रशासकीय ठराव क्र.१५१ दि.०६/१०/२०२०
२) मा. प्रशासकीय ठराव क्र.२२७ दि.१२/११/२०२०
३) मा. प्रशासकीय ठराव क्र.२७३ दि.१४/१२/२०२०
४) मा. प्रशासकीय ठराव क्र.५७७ दि.०८/०३/२०२१

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई व विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा अशी २ रुग्णालये व १ सुपरस्पेशालिटी पॉली क्लिनिक कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. तसेच शासनाने कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) या आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड रुग्णालये स्थापन करण्यांत आली आहे. कोरोना विषाणू या आजारावर नियंत्रण आणणेकामी महानगरपालिकेने विविध उपाययोजना केलेल्या असून कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण, कोव्हीड-१९ फिरते रोग निदान चाचणी केंद्र, फिरते लसीकरण केंद्र, कोरोना कंट्रोल वॉर रुम यासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करण्यांत आलेला आहे. यानुसार महानगरपालिकेने कोव्हीड-१९ कामकाजासाठी थेट मुलाखती घेऊन विविध टप्प्यांमध्ये आवश्यकतेनुसार नियुक्त करण्यांत आलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी विविध दिनांकास समाप्त झाल्याने कोव्हीड-१९ कामकाजाची आवश्यकता लक्षात घेऊन सदर पदांना १ दिवसांचा तांत्रिक खंड देऊन मा. प्रशासकीय ठराव क्र.१५१ दि.०६/१०/२०२०, मा. प्रशासकीय ठराव क्र.२२७ दि.१२/११/२०२० व मा. प्रशासकीय ठराव क्र.२७३ दि.१४/१२/२०२० अन्वये ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ दिलेनुसार पुनर्नियुक्ती आदेशानुसार मायक्रोबायोलॉजीस्ट-०२, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-१६, जी.एन.एम.-१०८, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-११ व क्ष-किरण सहाय्यक-०२ ही पदे दरमहा मानधन तत्वावर कार्यरत आहेत.

यानुसार मा. प्रशासकीय ठराव क्र.१५१ दि.०६/१०/२०२०, मा. प्रशासकीय ठराव क्र.२२७ दि.१२/११/२०२० व मा. प्रशासकीय ठराव क्र.२७३ दि.१४/१२/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यांत आलेल्या उपरोक्त वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड-१९ रुग्णालये, कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेटर व क्वारंटाईन सेंटरमध्ये हजर झालेनुसार या सर्वांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी विविध दिनांकास समाप्त होत आहे. सबब या सर्व कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाचा सेवा कालावधी विविध दिनांकास समाप्त होत असल्याने त्यांचा सेवा कालावधी हा प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने दि.१९/०६/२०२१ रोजी या एकाच दिवशी कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने समाप्त करणे आवश्यक आहे. व तसा आदेश संबंधितांना निर्गमित करणे योग्य होईल.

कोव्हीड-१९ विषाणू संभाव्य तिसऱ्या लाटेची शक्यता असल्याने व महानगरपालिका क्षेत्रात म्युकरमायकोसिस या आजाराचे रुग्ण आढळून आल्याने त्यांचेवर उपचाराकरीता कौल सिटी, समर्पित कोव्हीड रुग्णालय सुरु करण्यांत आले असुन याठिकाणी रुग्ण दाखल करण्यात येत आहेत. यानुसार सदरची पार्श्वभूमी लक्षात घेता या सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता असल्याने या सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गास दि.२०/०६/२०२१ रोजी एक दिवसांचा तांत्रिक खंड देऊन कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामाची गरज लक्षात घेऊन या सर्व कार्यरत वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गांना दि.२१/०६/२०२१ रोजी पासून पुढील ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. व तसा संबंधीतांना कामकाज करणे कामी मुदतवाढीचा आदेश निर्गमित करणे योग्य होईल. याकामी सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.१ मध्ये नमुद वेतनापोटी सहामाही अंदाजे रु.३,१४,७६,६००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षात "वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.३१,२१,५०,०००/- या तरतुदी मधून भागविता येईल. तरी सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत कार्यरत महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड-१९ रुग्णालये, कोव्हीड केअर सेंटर, कोव्हीड हेल्थ सेटर व क्वारंटाईन सेंटर येथे कोव्हीड-१९ च्या कामकाजाकरीता कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत सेवा घेणेकामी थेट मुलाखती घेऊन नियुक्त केलेल्या या सर्व वैद्यकीय अधिकारी मायक्रोबायोलॉजीस्ट-०२, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-१६, जी.एन.एम.-१०८, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-११ व क्ष-किरण सहाय्यक-०२ वर्गाचा सेवा कालावधी विविध दिनांकास संपणार असल्याने या सर्वांचा ६ महिन्यांचा सेवा कालावधी हा दि.१९/०६/२०२१ या एकाच दिवशी समाप्त करणेस व दि.२०/०६/२०२१ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा व कोव्हीड-१९ चे कामकाजाची अत्यावश्यकता लक्षात घेऊन या सर्व वैद्यकीय अधिकारी मायक्रोबायोलॉजीस्ट-०२, वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस.-१६, जी.एन.एम.-१०८, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-११ व क्ष-किरण सहाय्यक-०२ यांना दि.२१/०६/२०२१ पासून पुढील ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यंत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यंत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी वेतनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

<u>प्रपत्र क्र.१</u>

महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कामकाजासाठी रुग्णालये, कोव्हीड-१९ रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, कोव्हीड हेल्थ सेंटर, ~~कोव्हीड केअर सेंटर व क्वारंटाईन सेंटर~~ यासाठी वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गाचा मानधनाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | पदनाम | एकूण कार्यरत पदे (कंत्राटी) | मंजूर मानधन रु. | दर महा होणारा खर्च रु. | सहा माही होणारा खर्च रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी बी.ए.एम.एस. | 16 | 50000 | 800000 | 4800000 |
| २ | मायक्रोबायोलॉजीस्ट | 01 | 110000 | 110000 | 660000 |
| | | 01 | 85000 | 85000 | 510000 |
| ३ | जी.एन.एम. (अधिपरिचारीका) | 108 | 34800 | 3758400 | 22550400 |
| ४ | फार्मासिस्ट | 12 | 20800 | 249600 | 1497600 |
| ५ | प्रयोगशाळा सहाय्यक - | 11 | ~~18700~~ | ~~205700~~ | ~~1234200~~ |
| ६ | क्ष-किरण सहाय्यक | 02 | 18700 | 37400 | 224400 |
| एकूण | | | | 52,46,100 | 3,14,76,600 |

प्रशासकीय ठराव क्र.२४२

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-१८/०६/२०२१

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्त्यामधील रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी मैला टँकर खरेदीच्या निविदेतील प्राप्त निविदेकार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत संविदा करुन कार्यादेश देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई या शहराच्या लगतचे शहर म्हणून उदयास आले आहे. मुंबई शहरात कामानिमित्त येणाऱ्या नोकदारांनी राहण्यासाठी उत्तम शहर म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राला पसंती देण्यात येत आहे. त्यामुळे या शहराचा विकास व लोकसंख्या यांची वाढ मोठया प्रमाणात होत आहे. शहरात मोठया प्रमाणात नागरी वस्ती निर्माण झाल्या आहे. सदरील वस्त्यांमध्ये मोठया प्रमाणात रहिवाशी ईमारती उभ्या झाल्या आहे. सदरील इमारतीचे दैनंदिन निर्माण होणारे सांडपाणी हे ईमारतीच्या सेप्टीक टँक मध्ये सोडण्यात येते. तरी दैनंदिन निर्माण होणारे शौच टाकीतील सांडपाणी तक्रारी नुसार संक्शन करणे आवश्यक व गरजेचे आहे. त्याकरिता मनपाने ५ मैला टँकर खरेदीसाठी प्रशासकीय ठराव क्र.३४१ दिनांक ०८/०१/२०२१ मंजूरी घेऊन महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त Gem Portal वरुन दिनांक ०३/०५/२०२१ तें ३१/०५/२०२१ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरील निविदेत **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** हे एल १ म्हणून प्राप्त झाले आहे. सदरील निविदेत ५ मैला टँकरसाठी रक्कम रु.३०,७८,५००/- एवढा दर दिला असून सदरील प्राप्त दर निविदा समिती पुढे ठेवला असता दिनांक ०७/०६/२०२१ रोजी निविदेतील प्राप्त दरात १% दर कमी करावा असा निर्णय दिला आहे. त्यानुसार जा.क्र.वविशम/आरोग्य/२०४/२०२१ दिनांक ०८/०६/२०२१ रोजी **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांना निविदेतील प्राप्त दरात वाटाघाटी करणेस पत्र दिले आहे.

त्यानुसार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांनी दिनांक ०९/०६/२०२१ रोजी पत्र देऊन प्राप्त दरात १% दर कमी करुन प्रती मैला टँकरसाठी रक्कम रु.६,०९,५४३/- एवढा दर दिला असून ५ मैला टँकरसाठी रक्कम रु.३०,४७,७१५/- (अक्षरी रक्कम रु.तीस लक्ष सत्तेचाळीस हजार सातशे पंधरा मात्र) एवढा दर दिला आहे. तरी वाटाघाटी अंती प्राप्त दरास निविदा समिती पुढे ठेवला असता दिनांक ११/०६/२०२१ रोजी निविदा समितीने प्राप्त दरास मंजूरी देऊन सदरील निविदाकारा सोबत संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो. तथा प्रशासक यांची मंजूरी घेण्यास मंजरी दिली आहे. त्यानुसार निविदेतील प्राप्त निविदेकार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत संविदा करुन कार्यादेश देणेस सविनय सादर.

**ठराव निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्त्यामधील रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी ५मैला टँकर खरेदीच्या निविदेतील प्राप्त निविदेकार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत संविदा करुन कार्यादेश देणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास मंजूरी देत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

प्रशासकीय ठराव क्र. २४३

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

दिनांक :- १८/०६/२०२१

---

**विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करिता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन मंजूर निविदेकार मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेकामी संविदा करुन कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता दैनंदिन गटार सफाई यांत्रिक पध्दतीने करणकामी ६ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेकामी प्रशासकीय ठराव क्र.४४२ दिनांक २८/०१/२०२१ नुसार प्रशासकीय मंजूरी घेऊन जाहिर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदरील निविदेत **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांच्या सोबत करारनामा करुन जा.क्र.वविशम/आरोग्य/३९/२०२१ दिनांक ०९/०४/२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आला आंहे. त्यानुसार दिनांक २४/०५/२०२१ रोजी ६ सक्शन कम जेटींग मशीन पुरवठा केला आहे. त्यानुसार सदरी मशीन गटार सफाईच्या कामास वापरण्यास सुरू केल्यानंतर सदरील मशीन गटार सफाईचे काम उत्तमरित्या करत असल्याने मा.आयुक्त सो. यांनी ३ अतिरिक्त सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत. जेणेकरुन प्रत्येक प्रभागा मध्ये १ सक्शन कम जेटींग मशीन दिल्यास चांगल्याप्रकारे गटार सफाई होऊ शकते.

परंतु ६ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतली असल्याने व नव्याने ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया करणे ऐवजी

**महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक :भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग- III /उद्योग-४ मधील ३.३.२** पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश सुरूवातीचा आदेश दिल्यानंतर ६ महिन्यांच्या काळावधीच्या पूर्वी देता येईल. पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देत येईल आणि त्याचे मूल्य आणि संख्या सुरूवातीच्या आदेशाच्या **५०% किंवा रुपये दहा कोटी (रु.१० कोटी)** यापैंकी जे कमी असेल त्यापर्यंची खरेदी करता येईल. त्यानुसार सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील पुरवठादार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि.** यांना ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी पुनर्प्रत्ययी आदेश होणेस व प्रति सक्शन कम जेटींग मशीनसाठी **रक्कम रु.३८,८१,०००/-** प्रमाणे ३ मशीनसाठी **रक्कम रु.१,१६,४३,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी सोळा लक्ष त्रेचाळीस हजार मात्र)** एवढा खर्च होणार आहे.

सदरील खर्च सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **वाहन खरेदी/ रोड रोलर** खरेदी या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद **रक्कम रु.१४ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी **६ सक्शन कम जेटींग मशीन** खरेदीसाठी रक्कम **रु.२,३२,८६,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी बत्तीस लक्ष श्याऐंशी हजार मात्र)** एवढया रक्कमेस प्रशासकीय वित्तीय मान्यता देऊन **३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदीसाठी** रक्कम **रु.१,१६,४३,०००/-** असे मिळून **रक्कम रु.३,४९,२९,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन कोटी एकोणपन्नास लक्ष एकोणसतीस हजार मात्र)** एवढया रक्कमेस

प्रशासकीय ठराव क्र.---------- दिनांक / /२०२१ अन्वये होणाऱ्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन पुनर्प्रत्ययी आदेश देणकामी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार **मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि** यांच्याकडून ३ सक्शन कम जेटींग मशीन खरेदी करणेसाठी संविदा करुन कार्यादेश देणेकामी प्रशासकांची मंजूरी घेणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-** **वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत गटार सफाई करिता अतिरिक्त ३ सक्शन कम जेटींग मशीन मंजूर निविदेकार मे.क्वालीटी एनवायरो इंजिनियर्स प्रा.लि. यांचेकडून खरेदी करणेकामी संविदा करुन कार्यादेश देणेस मान्यता देत आहे.**

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** २४४

**विभाग :- वाहन**
**दिनांक :-** १८/०६/२०२१

**विषय :- महानगरपालिकेच्या दिवाबत्ती विभागासाठी खरेदी करणेत आलेलया महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनावर बॉडी बांधणेकामी दरपत्रक मागवून येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समितींना दिवाबत्ती विभागास ९ नग बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७T वाहने शासनाच्या जी.ई.एम पोर्टलवरुन खरेदी करणेत आलेली आहेत. सदर वाहने दिवाबत्ती विभागास वर्ग करण्यात आलेली असून दिवाबत्ती विभागामार्फत महापालिका कार्यक्षेत्रात असलेल्या परिसरात ईलेक्ट्रीक सामान वाहून नेणे, स्ट्रिटलाईट दुरुस्ती करणे, दिवाबत्तीची व्यवस्था करणे व इतर कामकाजामांकरिता सदर वाहने वापरण्यात येत आहेत.

परंतु सदर वाहनांवर बॉडी नसल्याकारणाने ईलेक्ट्रीक सामान, स्ट्रिटलाईट दुरुस्तीची इलेक्ट्रीक उपकरणे व त्यावर काम करणारे कर्मचारी पावसात भिजत आहेत. त्यामुळे इलेक्ट्रीक उपकरणे खराब होऊन महानगरपालिकेचे आर्थिक नूकसान होत आहे. करिता सदर वाहनांवर लवकरात लवकर बॉडी बांधून मिळणेबाबत दिवाबत्ती विभागामार्फत पत्र देण्यात आलेले आहे.

सदर वाहनांवर बॉडी बांधली असता महानगरपालिकेचे आर्थिक नूकसान न होणेस व महानगरपालिकेचे काम सूलभरित्या सुरु ठवणे सोयीस्कर होईल. करिता ०९ नग महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनावर बॉडी बांधणीचे काम करावयाचे असल्यास प्रति वाहनासाठी अंदाजित रक्कम रु. ३२,५००/- मात्र सर्व करांसहीत खर्च अपेक्षित आहे.

तरी खरेदी करण्यात आलेल्या ०९ नग महिंद्रा बोलेरा पिकअप वाहनावर बॉडी बांधून दिवाबत्ती विभागास वाहने उपलब्ध करुन देणेच्या दृष्टीने दरपत्रक मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.२,९२,५००/- इतक्या खर्चास मंजूरी मिळणेस्तव सदर प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ९ प्रभाग समितींना दिवाबत्ती विभागास ९ नग बोलेरो पिकअप BS-VI PS, १.७T वाहनावर बॉडी बांधणेकामी दरपत्रक मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.२,९२,५००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी – २०२०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४५ | विभाग : लेखापरीक्षण
दिनांक : १८/६/२०२१

प्रस्तावाचा विषय :- स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, (मनपालेप), नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला लेखापरीक्षण अहवाल सन २०१५-१६, सन २०१६-१७-१८ त्यावरील अनुपालनांसह मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सादर करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई-विरार शहर महानरपालिकेचे सन २०१५-१६, सन २०१६-१७-१८ या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षण महाराष्ट्र शासनाच्या स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय (मनपालेप), नवी मुंबई यांचे कार्यालयमार्फत करण्यात आलेले आहे. सन २०१५-१६ व सन २०१६-१७-१८ या वित्तीय वर्षांचे अंतिम लेखापरीक्षण अहवाल महानगरपालिकेस अनुक्रमे दि.१६/०१/२०२० व दि.२५/११/२०२० रोजी प्राप्त झाले असून सदर लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे परिपूर्ण अनुपालन अहवाल महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम २०११ चे कलम १०(१) मधील तरतुदींनुसार प्रशासकीय ठरावाच्या प्रतीसह अहवाल प्राप्त झालेपासून चार महिन्यांच्या आत स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागास पाठविणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये ९० परिच्छेद तर सन २०१६-१७-१८ या वित्तीय वर्षांचे लेखापरीक्षण अहवालामध्ये ११७ परिच्छेद असून संबंधीत विभागांमार्फत सदर परिच्छेदांचे अनुपालन तयार करण्यात आलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे लेखापरीक्षण अहवाल अनुपालनासह मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे माहितीस्तव व स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, (मनपालेप), नवी मुंबई यांचेकडे सादर करणेस

ठराव:- स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, (मनपालेप), नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला लेखापरीक्षण अहवाल सन २०१५-१६, सन २०१६-१७-१८ या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षण अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या आक्षेपांचे अनुपालन संबंधीत विभागांकडून प्राप्त झाले असून सदरील अनुपालन अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा (मनपालेप), नवी मुंबई यांचेकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(सही)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 246

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक : 18 / 06 / 2021**

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तसेच रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता कोव्हीड हॉस्पिटलची आवश्यकता आहे. हॉस्पिटलच्या इमारतीचे बांधकाम झाल्यास त्यामध्ये रूग्णांसाठी ऑक्सिजन बेडची व्यवस्था करणे शक्य होईल. तरी एकूण परिस्थिती लक्षात घेता रूग्णांच्या सोयीच्या दृष्टीने प्रभाग समिती (ई) मधील कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे आवश्यक आहे.

सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 98,42,248/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

तरी सदर जागेची पाहणी करून रक्कम रू. 98,42,248/- चे सन 2019-20 च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करून सदर कामी ठराव क्र. 231 नुसार दि. 16/6/2021 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तसेच मा. शहर अभियंता यांनी दि.......................... रोजी बूक नं......... पेज नं.......... सन 2020-21 नुसार रक्कम रू. 98,42,248/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजूरी दिलेली आहे.

सबब प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. मेहूल अरविंद वर्तक या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर.

---

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 58 मधील मासळी मार्केट या इमारतीचे कोव्हीड सेंटर हॉस्पिटलमध्ये रूपांतर करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. मेहूल अरविंद वर्तक या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४७

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १८/०६/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास नवजात बालकांच्या रुग्णालयाकरिता आवश्यक C-PAP विनानिविदा खरेदी करणेकामी आदेश देणेस व याकामी येणा-या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार कौलसिटी -वसई, व जुचंद्र कोवीड रुग्णालय, नायगाव (पू) येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, वरूण इंडस्ट्रियल ईस्टेट व म्हाडा संकुलन, बोळींज येथे समर्पित कोविड - केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये कोरोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. शासनामार्फत तसेच संभाव्य येणारी तिसरी लाट यामध्ये लहान मुले संक्रमित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी पुढिल कालावधीत लहान मूलांची विशेष काळजी घेण्याकरिता नवजात बालक व लहान बालके यांच्या उपचाराकरिता बोळींज, विरार (प) येथे नव्याने रुग्णालय उभारण्यात आले असुन सदर रुग्णालयाकरिता C-PAP ची आवश्यकता आहे. याकरिता निविदा यादीमध्ये मंजुर असलेल्या घटकांची मागणी नोदविण्यात आलेली आहे. परंतु निविदा यादीत सामाविष्ट नसलेले तसेच समाविष्ट असुन पुरवठाधारक पुरवठा करण्यास असमर्थ असलेले उपकरणे व साहित्य स्थानिक पातळीवर त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. याकामी मे.नॅचरल्स स्मार्ट सोल्यूशन प्रा.लि., मिरा रोड, मे.फार्मा वर्ल्ड, मिरा रोड, मे.ऑक्सिकेअर इंटरप्रायझेस, पुणे या अधिकृत विक्रेत्याकडे उपलब्ध असून यांच्यामार्फत दर प्राप्त झाले असून याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तसेच सदर दर बाजार भावाप्रमाणे योग्य आहे.

| अ. क्र. | साहित्याचे नाव | मागणी | मे.नॅचरल्स स्मार्ट इंटरप्रायझेस सोल्यूशन प्रा.लि. | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | C-PAP Machine<br>**Bubble CPAP Generator**<br>Bubble CPAP Generator has a special scale to measure CPAP level by adjusting the round pipe with the water level.<br>CPAP adjustable between 1 cmH2O to 10 cmH2O.<br>**Humidifier:**<br>Humidifier is a servo temperature control unit for humidifying water with digital temperature display for chamber temperature and airway temperature.<br>It has audio Visual alarm system for conditions like high & low temperature.<br>**AIR OXYGEN MIXER:**<br>It has the provision to deliver gas with selectable FiO2 (21% - 100%) based on the chart by adjusting the flow of Air and Oxygen between 0 to 15 lpm.<br>**Nasal Interface:**<br>Non Invasive Nasal Interface includes Nasal Prongs for five sizes Supplied with 1 no of Disposable Heated wire based Circuit | 50 | **169000** | 8450000 |
| | | | GST 12% | 1014000 |
| | | | Total | Rs.94,64,000/- |

सद्यस्थितीत मे.नॅचरल्स स्मार्ट सोल्यूशन प्रा.लि., मिरा रोड यांच्याकडील प्राप्त दर सर्वात कमी असुन यांच्याकडे वरील नमुद C-PAP उपलब्ध असून कोरोना विषाणू संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता सदरचे C-PAP त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास C-PAP खरेदी करणे कामी रू.९४,६४,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२१-२२ वित्तिय वर्षाकरीता "ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुचि ड प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरचे C-PAP विनानिविदा खरेदी करणेकामी मे.नॅचरल्स स्मार्ट सोल्यूशन प्रा.लि., मिरा रोड यांना पुरवठा आदेश देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रू.९४,६४,०००/- (अक्षरी- चौ-याण्यव लाख चौसष्ठ हजार रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्रं. २४८

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा

दिनांक :-१८/०६/२०२१

**विषय:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागामधील इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ३) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ४) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ६) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ७) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव अशी मिळून एकुण ७ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. सदर ठिकाणी ३१ अग्निशमन वाहने कार्यरत आहेत. तसेच अग्निशमन विभागाकरीता १७७ फायरमन व ४१ वाहनचालक असे एकुण २१८ कंत्राटी कर्मचारी असून ८ कायम आस्थापनेवरील कर्मचारी २४x७ सेवा बजावत आहेत.

महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता सन २०१८ मध्ये ६ इन्फ्लेटेबल बोट खरेदी करण्यात आल्या असून सदर बोटींचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. तसेच बोटींच्या मशीनचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता मंजुर ठेकेदार नाही. पावसाळयात अतिवृष्टीमुळे महापालिका कार्यक्षेत्रातील काही भागात पूर परिस्थिती निर्माण होते तेंव्हा नागरींकाना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी या बोटींचा वापर होतो. तसेच तलाव, नदी व समुद्रातील बुडणा-या व्यक्ती किंवा मृत व्यक्तीस बाहेर काढण्यासाठी या बोटींचा वापर होतो. तरी सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीन नादुरुस्त असून पावसाळयापूर्वी सदर मशिनची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करीता मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांना कळविले असता सदर कंपनीचे कुशल तांत्रिक अभियंता यांनी दिनांक ३१/०३/२०२१ तपासणी केली व त्यानुसार दिनांक ०५/०४/२०२१ रोजी सर्व्हिस रिपोर्ट सादर केला असून रक्कम रु. १,७३,८८३/- रुपयाचे दरपत्रक (कोटेशन) सादर केले आहे. तरी सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करीता अंदाजीत रक्कम रुपये १,८०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ३० वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** यामध्ये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

तरी अग्निशमन विभागातील इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीन मध्ये दुरुस्ती कामा करीता लागणारे साहित्य विना निविदा मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून थेट खरेदी करणे कामी व त्यासाठी येणा-या अंदाजित रक्कम रु. १,८०,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीन मध्ये दुरुस्ती कामा करीता लागणारे साहित्य विना निविदा मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून थेट खरेदी करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर दुरुस्ती कामा करीता लागणारे साहित्य खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. १,८०,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** २६९ **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** १८ / ०६ / **2021**

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 61 मधील पाटणकर पार्क येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिालका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 61 मधील पाटणकर पार्क मधील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले असून सदर ठिकाणी नागरीकांची मोठया प्रमाणात गर्दी होते. सबब सद्यस्थितीत नागरीकांना उन्हाचे चटके सहन करत लसीकरणासाठी रांगेत उभे राहावे लागते. तसेच नजीकचा पावसाळा लक्षात घेता नागरीकांना पावसात रांगेत उभे राहण्याच्या दृष्टीने व बसण्याकरीता सोयीचे व्हावे यादृष्टीने पाटणकर पार्क मधील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने लसीकरण केंद्रासाठी तातडीने शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 53,08,929/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 61 मधील पाटणकर पार्क येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 67(3) क अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेचे सादर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 61 मधील पाटणकर पार्क येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नव्याने सुरू झालेल्या लसीकरण केंद्रासाठी शेड बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रू. 53,08,929/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र..** 240 **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** 96 /08/ **2021**

---

| | | |
|---|---|---|
| प्रस्तावाचा विषय | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणे. |
| प्रस्तावाचा मजकूर | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता तसेच रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता नव्याने कोव्हीड हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. सदर हॉस्पिटलच्या इमारतीभोवती कंपाऊंड वॉल, पत्र्याचे शेड, पाण्याची टाकी बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे गरजेचे आहे. तसेच जनरेटर सुरक्षित ठेवणेसाठी कठडयाचे बांधकाम करणे तसेच इटीपी प्लांट व ऑक्सिजन निर्मिती करणेसाठीच्या प्लांटसाठी आवश्यक कठडा व पत्र्याची शेड करणे आवश्यक आहे.<br>सन 2019-20 च्या जिल्हा दर सूचीनुसार रू. 1,78,13,497/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.<br>तरी सदर जागेची पाहणी करून रक्कम रू. 1,78,13,497 /- चे सन 2019-20 च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करून सदर कामी ठराव क्र. .......... नुसार दि.......................... रोजी मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. तसेच मा. शहर अभियंता यांनी दि.......................... रोजी बूक नं......... पेज नं........... सन 2020-21 नुसार रक्कम रू.1,78,13,497/- इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजूरी दिलेली आहे.<br>सबब प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. मेहूल अरविंद वर्तक या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीस्तव सादर. |
| ठराव | :- | वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जुन्या फिश मार्केटचे नव्याने कोव्हिड हॉस्पिटल मध्ये रूपांतर केलेल्या इमारतीस कंपाऊंड वॉल, पाण्याची टाकी व इतर अनुषंगीक कामे करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. मेहूल अरविंद वर्तक या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 10.00 % कमी दराने काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे. |

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्रं. २५१ | विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२२/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागाकरीता रेस्क्यू टोटल किट या वैयक्तिक सुरक्षा साहित्य खरेदी केले बाबतचे कामास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता वैयक्तिक सुरक्षा साहित्य (Personal Protective Equipment) पुरवठा करणे कामी संदर्भ क्रं. १ अन्वये ई-निविदा मागविण्यात आली होती. संदर्भ क्रं. २ नुसार मा. स्थायी समिती सभा ठराव क्रं. ३२९ दिनांक ११/०९/२०१९ रोजी अन्वये दर मंजुर झाले होते.

त्यामध्ये अ.क्रं. ९ मधील रेस्क्यू टोटल किट प्रति संच रु. ८,१३,७०८/- मंजूर करण्यात आला होत. वैयक्तिक सुरक्षा साहित्यामध्ये रेस्क्यू टोटल किट मध्ये प्राप्त झालेल्या दरामध्ये खालील प्रमाणे साहित्याचा समावेश आहे.

| SR. NO. | EQUIPMENT | QUOTED UNIT PRICE | NEGOTIATED UNIT PRICE | QTY | TOTAL NEGOTIATED PRICE | TOTAL AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Rappelling Gloves | 6,070 | 5,949 | 2 | 11,898 | 14,040 |
| 2 | Harness Rescue (personal)/Full Body Harness | 31,200 | 30,576 | 2 | 61,152 | 68,490 |
| 3 | Rescue Harness for Victim | 12,600 | 12,348 | 1 | 12,348 | 13,830 |
| 4 | Compact/Self Breaking cam based Descender | 16,800 | 16,464 | 2 | 32,928 | 38,855 |
| 5 | Self Breaking cam based Descender with antipanic function | 21,600 | 21,168 | 2 | 42,336 | 49,956 |
| 6 | Descender-Figure of 8 | 1,200 | 1,176 | 2 | 2,352 | 2,775 |
| 7 | Ascender/Jummar | 13,680 | 13,406 | 2 | 26,812 | 31,638 |
| 8 | Adjustable webbing foot loop for Ascender/ Jummar | 2,400 | 2,352 | 2 | 4,704 | 5,268 |
| 9 | Rope clamp/grab | 12,000 | 11,760 | 1 | 11,760 | 13,877 |
| 10 | Mobile fall-arrest device for rope | 21,000 | 20,580 | 1 | 20,580 | 24,284 |
| 11 | Energy absorber for Mobile Fall Arrester | 4,560 | 4,469 | 1 | 4,469 | 5,273 |
| 12 | Progression lanyard | 3,360 | 3,293 | 2 | 6,586 | 7,376 |
| 13 | Webbing Flat Sling/ Anchor Sling 150cms | 1,200 | 1,176 | 2 | 2,352 | 2,634 |
| 14 | Rapid adjustment anchor strap | 5,520 | 5,410 | 1 | 5,410 | 6,059 |
| 15 | High-strength steel oval auto-lock carabiner | 1,920 | 1,882 | 4 | 7,528 | 8,883 |
| 16 | Oval auto-lock carabiner | 2,160 | 2,117 | 4 | 8,468 | 9,992 |
| 17 | D shaped auto-lock carabiner | 2,880 | 2,822 | 4 | 11,288 | 13,320 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 18 | Wide/Pear shaped auto lock carabiner | 2,880 | 2,822 | 4 | 11,288 | 13,320 |
| 19 | Ball bearing swivel | 7,680 | 7,526 | 1 | 7,526 | 8,881 |
| 20 | Paw Rigging plate | 5,400 | 5,292 | 1 | 5,292 | 6,245 |
| 21 | Self Jamming Pulley for Hauling Systems | 13,200 | 12,936 | 1 | 12,936 | 15,264 |
| 22 | Double pulley: For Hauling system | 11,400 | 11,172 | 1 | 11,172 | 13,183 |
| 23 | High strength Rescue Pulley | 6,720 | 6,586 | 1 | 6,586 | 7,771 |
| 24 | Jag System Haul Kit | 28,200 | 27,636 | 1 | 27,636 | 32,610 |
| 25 | Flexible rope protector | 1,500 | 1,470 | 2 | 2,940 | 3,293 |
| 26 | Personal Escape System with Anchor Hook | 42,000 | 41,160 | 2 | 82,320 | 97,138 |
| 27 | Knife with carabiner hole | 2,250 | 2,205 | 2 | 4,410 | 4,939 |
| 28 | Durable large-capacity bag | 13,275 | 13,010 | 2 | 26,020 | 30,704 |
| 29 | Low-stretch kernamental rope 10.5mm x 100 Mtrs | 24,700 | 24,206 | 1 | 24,206 | 27,111 |
| 30 | Low stretch kernamental rope 11mm x 100 Mtrs | 31,200 | 30,576 | 1 | 30,576 | 34,245 |
| 31 | Emergency Headlamp | 3,360 | 3,293 | 2 | 6,586 | 7,771 |
| 32 | Fall arrest harness | 13,800 | 13,524 | 1 | 13,524 | 15,147 |
| 33 | Spreader for Fall arrest harness | 12,600 | 12,348 | 1 | 12,348 | 13,830 |
| 34 | Tripod & Winch for confined space access & rescue | 450,000 | 441,000 | 1 | 441,000 | 520,380 |
| | | 830,315 | 813,710 | | 999,337 | 1,168,384 |

वरील प्रमाणे एका रेस्क्यू टोटल किट संचामध्ये घटक येत असून त्याचा एकत्रित दर रु. ८३०३१५/- येत असून वाटाघाटीचा दर रक्कम रु. ८१३७१०/- येत आहे. साहित्य खरेदी करते वेळी मा. स्थायी समिती सभा ठराव क्रं. २३९ दिनांक ११/०९/२०१९ रोजी अन्वये मंजुरी घेतेवेळी १ ते ३४ घटकांमधील प्रत्येक संचामधील एक एक घटक घेण्यात आला होता. व त्यांची किंमत ठरावात नमूद करण्यात आली होती. ती रक्कम रु. ८,१३,७०८/- झाली व त्याप्रमाणे मंजुरी घेण्यात आली. व जा.क्रं. वविशम/अग्नि/मुका/६३७ /२०१९, दि. १३/०९/२०१९ रोजी अन्वये कार्यादेश दिला गेला.

परंतू प्रत्यक्षांत संचाची जुळणी करतांना काही बाबींचे घटक एका पेक्षा अधिक असल्याने व ती बाब नजरचूकीने राहिल्याने संच पूर्ण होत नव्हता. त्याकरीता रेस्क्यू संचासाठी लागणारे आवश्यक घटक १ ते ३४ मधील घेण्यात आले. त्याची रक्कम रु. ११६८३८४/- होत आहे.

वरील प्रमाणे रेस्क्यू टोटल किट एका संचासाठी रक्कम रु. ११६८३८४/- झाली असून मा. स्थायी समिती सभा ठराव क्रं. ३२९, दिनांक ११/०९/२०१९ मध्ये ती रक्कम रु. ८१३७०८/- आहे. त्यामुळे रक्कम रु. ३५४६७४/- वाढीव खर्च होत असून वाढीव खर्चाचे रक्कम रु. ३५४६७४/- रकमेस कार्योत्तर मंजुरी घेणे आवश्यक आहे.

अग्निशमन विभागास रेस्क्यू टोटल किटची अत्यंत आवश्यकता असल्याने मा. स्थायी समिती सभा ठरावामध्ये एकत्रित संचाची रक्कम रु. ८१३७०८/- नमूद केली असली तरी त्या व्यतिरिक्त रु. ३५४६७४/- वाढीव खर्च झालेला आहे.

तरी रेस्क्यू टोटल किट खरेदी कामी रक्कम रु. ३५४६७४/- वाढीव झालेल्या खर्चास मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरीता रेस्क्यू टोटल किट पुरवठा केला असून मा. स्थायी समिती सभा ठराव क्रं. ३२९ दिनांक ११/०९/२०१९ रोजी सदर १ ते ३४ घटकामधील प्रत्येक संचामधील एक एक घटक घेण्यात आल्याने त्याची किंमत रु. ८,१३,७०८/- सदर ठरावात नमूद करण्यात आली आहे परंतू प्रत्यक्षात सदर घटकामधील काही बाबींचे घटक एका पेक्षा अधिक लागत असल्याने रेस्क्यू टोटल किट संच पूर्ण होणेसाठी मंजूर दराने काही घटक खरेदी करण्यात आले व त्यासाठी एकुण रक्कम रु. ११,६८,३८४/- खर्च झाला आहे. तरी रक्कम रु. ३,५४,६७४/- मंजूर रक्कमेपेक्षा अधिक खर्च झाला असून सदर साहित्य हे अत्यावश्यक सेवेसाठी असल्याने झालेल्या वाढीव खर्च रक्कम रु. ३,५४,६७४/- रकमेस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्रं.२५२ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा

दिनांक :-२२/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** अग्निशमन विभागातील ४० मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर (TTL) वाहनाचे दुरुस्ती करीता स्पेटरपार्ट खरेदी करणेस येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र - आचोळे येथे टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंचीचे अग्निशमन व जीवसंरक्षक वाहन क्रमांक एम.एच. ४८ सी- ००३२ कार्यरत आहे. महानगरापलिका हद्दीमध्ये व हद्दी बाहेर कोणत्याही घटनास्थळी आग व रेस्क्यु वर्दी मिळताच आपल्या महानगरपालिका अग्निशमन विभागाचे कर्मचारी अग्निशमन वाहनासह त्वरीत घटनास्थळी पोहचतात. परंतु टर्न टेबल लॅडर वाहनाचे लॅडर मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लॅडर ऑपरेट होत नाही असे संदर्भिय अर्जान्वये वाहनचालक यांनी कळविले आहे.

वाहनाचे दुरुस्ती कामे करण्यासाठी लागणारे स्पेअर पार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका व लगतच्या पुणे, मुंबई या परिसरात नाही. सदर वाहन विदेशामधील ऑस्ट्रिया येथून विकत घेतले असल्याने त्यासाठी लागणारे स्पेअरपार्ट रोझनबार कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे उपलब्ध होतात. परंतू यापूर्वी गेली सात वर्ष सदर वाहनाचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. कंपनीस देण्यात आला होता. सदर AMC ठेका सप्टेबर २०२० पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाहनाचे दुरुस्ती करीता AMC ठेका नाही.

त्यामुळे वाहनचालकाचे प्राप्त अहवालानूसार अग्निशमन विभागाकडिल टर्न टेबल लॅडर वाहनाची तपासणी ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. या कंपनीकडूनच केली असता सदर कंपनीने खालील स्पेअरपार्ट मागविणे आवश्यक असले बाबत सर्व्हिस रिपोर्ट सादर केला आहे.

1) Proximity switch closer MS with cable cage door
2) Plug housing
3) Pin Contact
4) Single conductor seal

त्यानुसार उपरोक्त स्पेअरपार्ट खरेदी करणे करीता रक्कम रु. २४,२२०/- खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका मधील पान नं. ३१ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** मध्ये तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी टर्न टेबल लॅडर वाहनाचे उपरोक्त दुरुस्ती कामे महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार रोझनबार कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचे कडून विना ई-निविदा थेट खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. २४,२२०/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

<u>ठराव :-</u> अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंच शिडीचे वाहन विदेशातील रोझनबार इंटरनॅशनल यांचेकडून खरेदी केले आहे. या वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट भारतातील अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचे व्यतिरिक्त कोठेही उपलब्ध होत नसल्यामुळे लागणारे स्पेअरपार्ट हे मुळ कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडून उपलब्ध करावे लागणार आहेत व त्यांनी साहित्याच्या दराबाबत प्रोफॉर्मा इनव्हाईस दिले आहे. प्रोफॉर्मा इनव्हाईस मधील दराप्रमाणे टर्न टेबल लॅडर वाहनास लागणारे साहित्य रोझनबार इंटरनॅशनल कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत विक्रेते ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार विना निविदा थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रु. २४,२२०/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

पृ १५

# वसई-विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्रं. २५३

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२२/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथील मकिटा चैन सॉ कटर मशीनचे चैन व पाटे दुरुस्ती खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती, झाडाचे कॉल मोठया प्रमाणावर प्राप्त होत असतात. दिनांक १६/०५/२०२१ ते १९/०५/२०२१ रोजी झालेल्या तौक्ते चक्रिवादळामुळे प्रभाग समिती क्षेत्रामधील रहदारीच्या ठिकाणी, वस्तीच्या ठिकाणी, घरावर, इमारतींवर, विद्युत तारांवर, ट्रांन्सफॉर्मरवर, वाहनांवर, रस्त्यावर खुप मोठया प्रमाणात झाडे उन्मळून पडली होती. सदर झाडे सॉ कटर मशीनचे सहाय्याने कापून बाजूला करण्यात आली होती.

त्यामुळे ७ मशीनचे पाटे व चैन नादुरुस्त झाले होते. त्यामुळे सदर मशीनचे चैन व पाटे यांची दुरुस्ती मकिटा कंपनी मार्फत करण्यात आली आहे. तसेच सद्या पावसाळा सुरु झाला असल्याने जोरात वादळी वारे वाहू लागले आहेत त्यामुळे मोठया प्रमाणात महापालिका क्षेत्रात झाडे उन्मळून पडतात. पडलेली झाडे कापून बाजुला करण्यासाठी मकिटा कंपनीचे पेट्रोल ड्रिव्हन सॉ कटर मशिनची दुरुस्त करणे आवश्यक आहे.

सदर मशीनचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता महापालिकेकडे मंजूर ठेकेदार नाही. तसेच सदर मशीनचा उपयोग अत्यावश्यक सेवेत करण्यात येतो म्हणून सदर मशीनची दुरुस्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ प्रमाणे करण्यात आली आहे. मशीनचे दुरुस्ती करीता रक्कम रु. १६०९८/- खर्च झालेला आहे. सदर खर्च श्री. दिलीप पालव यांनी स्वतःहा रोखीने केलेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ०५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरूस्ती / कटर मशीन दुरूस्ती निगा** यामध्ये एकुण वार्षिक रुपये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी सदर दुरुस्ती साहित्य अत्यावश्यक बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) क अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना निविदा तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. १६०९८/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामधील चैन सॉ कटर मशीनची दुरुस्ती मकिटा कंपनी मार्फत करण्यात आली आहे. सद्या पावसाळया सुरु असल्याने सदर मशिनची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने झालेल्या रक्कम रु. १६०९८/- खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्रं. २५४ | विभाग :- अग्निशमन

दिनांक :-२२/०६/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय**:- अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागामधील इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता सन २०१८ मध्ये इन्फ्लेटेबल बोट खरेदी केली असून सदर बोटींचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. तसेच बोटींच्या मशीनचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता मंजुर ठेकेदार नाही. अतिवृष्टी, महापूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास सदर बाधीत लोकांना रेस्क्यू करण्याकरीता वापरण्यात येणारे इन्फ्लेटेबल बोट वरील O.B.M. ( Out Board Motor ) पेट्रोल पुरवठा करणा-या कॅन सोबत जोडण्याकरीता आवश्यक असलेले कनेक्टर पाईप नादुरुस्त असल्याकारणाने सदर स्पेअरपार्ट कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे आवश्यक आहे. तरी सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशिनची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करीता कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांना कळविले असता कंपनीने रक्कम रु. १९०७२/- रुपयाचे दरपत्रक (कोटेशन) सादर केले आहे. तरी सदर इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीनची दुरुस्ती करीता अंदाजीत रक्कम रुपये १९०७२/- खर्च अपेक्षित आहे.

तरी सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ३० वरील ५ नंबरचे लेखाशिर्षे **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** यामध्ये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. मशीन मध्ये दुरुस्ती कामा करीता लागणारे साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) अन्वये विना निविदा मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून थेट खरेदी करणेस व येणा-या अंदाजीत रक्कम रु. १९०७२/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागामधील इन्फ्लेटेबल बोटीचे ओ.बी.एम. नादुरुस्त असून सदर बोटीचे साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम अनुसुची ड प्रकरण ५ (२) (२) अन्वये विना निविदा कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. अमेया इंटरप्रायजेस, मुंबई यांचेकडून खरेदी करणेस येणा-या रक्कम रु. १९०७२/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**